# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले अधिवेशन, २०२२

---

### तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**शुक्रवार, दिनांक ०४ मार्च, २०२२ / फाल्गुन १३, १९४३ (शके)**

| | |
|---|---|
| (१) उप मुख्यमंत्री | यांचे प्रभारी विभाग |
| (२) जलसंपदा व लाभक्षेत्र विकास मंत्री | |
| (३) सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री | |
| (४) कामगार, ग्रामविकास मंत्री | |
| (५) वैद्यकीय शिक्षण, सांस्कृतिक कार्ये मंत्री | |
| (६) महिला व बालविकास मंत्री | |
| (७) मृद व जलसंधारण मंत्री | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ७२**

---

### खुलदाबाद (जि.औरंगाबाद) येथील धांड नदीचे पाणी गिरजा मध्यम प्रकल्पात वळते करणेबाबत

**(१) * ११८०० श्री.सतिश चव्हाण, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खुलदाबाद (जि.औरंगाबाद) तालुक्यात सर्वात मोठा गिरजा मध्यम प्रकल्प आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, म्हैसमाळ येथून उगम पावणाऱ्या गिरजा नदीवरील सदर प्रकल्पातून ८० टक्के गावांना पिण्यासाठी व शेतीसाठी लागणारे पाणी घेतले जात असून सदर प्रकल्प पर्जन्यवृष्टीअभावी पूर्ण क्षमतेने भरत नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, मौजे बोडखा येथून उगम पावणाऱ्या धांड नदीवर मौजे बाजार सावंगी ते गिरजा प्रकल्प (२.५ किमी) दरम्यान कॅनॉल करुन पाणी वळते केल्यास सदर प्रकल्प पूर्ण क्षमतेने भरुन पिण्याच्या पाण्यासाठी व शेती सिंचनासाठी मदत होईल, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, गिरजा मध्यम प्रकल्प पूर्ण भरण्याच्याद‍ृष्टीने धांड नदीवर बाजार सावंगी ते गिरजा मध्यम प्रकल्पापर्यंत कॅनॉल करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयंत पाटील :** (१) होय.
(२) अंशतः खरे आहे.

गिरजा मध्यम प्रकल्पाचे बांधकाम सन १९८७ साली पूर्ण करण्यात आले. सदर प्रकल्पात ३३ वर्षात ५ वेळा ७५ टक्के पेक्षा जास्त, १६ वेळा ७५ टक्के पेक्षा कमी व १२ वेळा शुन्य जलसाठा दिसून आला. सदर प्रकल्प पूर्ण क्षमतेने दरवर्षी भरत नाही.
(३) होय.
(४) खुलदाबाद तालुक्यातील धांड नदीचे पाणी गिरजा मध्यम प्रकल्पात वळविणे बाबतचा पाणी उपलब्धता प्रस्ताव मुख्य अभियंता, नियोजन व जलविज्ञान, नाशिक यांना सादर करण्यात आला. सदर प्रस्तावाबाबत मुख्य अभियंता, नियोजन व जलविज्ञान, नाशिक यांनी प्रस्तावित योजना पुर्णा उपखोऱ्यात सिध्देश्वर प्रकल्पाच्या वरील क्षेत्रात येत असून सदर भागात उपलब्ध येव्यापेक्षा मंजूर पाणी वापर जास्त असल्याने सदर योजनेस पाणी उपलब्ध होऊ शकणार नाही, असे कळविले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कोकणातील पश्चिम वाहिनी नदयांचे अतिरिक्त पाणी गोदावरी खोऱ्यात वळविण्याबाबत

**(२) * १२५५७ डॉ.सुधीर तांबे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अभिजित वंजारी, श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोदावरी खोऱ्यात पश्चिम वाहिनी उल्हास, वैतरणा, दमणगंगा या नद्यांतील अतिरिक्त वाया जाणारे पाणी वळविण्यासंदर्भात एकात्मिक जल आराखड्यामध्ये नियोजन करुन तसा प्राथमिक प्रस्ताव मुख्य अभियंता व मुख्य प्रशासक, लाभक्षेत्र विकास, जलसंपदा विभाग, औरंगाबाद यांनी शासनास सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावावर कोणती कार्यवाही करण्यात आली आहे, तसेच गोदावरी खोऱ्यात नद्यांचे पाणी वळविण्याच्या योजनांना विलंब होण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन प्रस्तावाच्या अनुषंगाने पश्चिम वाहिनी उल्हास, वैतरणा, दमणगंगा या नद्यांतील अतिरिक्त वाया जाणारे पाणी गोदावरी खोऱ्यात वळविण्याबाबत व सदर प्रस्तावाला निधीची उपलब्धता करुन योजना पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयंत पाटील :** (१) होय, अंशत: खरे आहे.

शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१९/ (११२/२०१९) जसंअ दिनांक १७/०९/२०१९ अन्वये, पश्चिम वाहिनी नदीखोऱ्यातून (कोकण) अतिरिक्त पाणी मराठवाड्यात वळविणेसाठी प्राथमिक अभ्यास करणेसाठी कार्यकारी संचालक, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद यांचे अध्यक्षतेखाली गठीत समितीचा अहवाल समितीचे सदस्य सचिव तथा अधीक्षक अभियंता व प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, औरंगाबाद यांनी त्यांचे पत्र दिनांक ३१/१०/२०१९ अन्वये शासनास सादर केलेला आहे.

(२) उपरोक्त गठित समितीने एकूण ८९.८५ अ.घ.फु. पाणी कोकणातून गोदावरी खोऱ्यात वळविणे बाबत शिफारस केली आहे. त्यापैकी ८१.४५ अ.घ.फु. उपसा वळण योजना असून ८.४० अ.घ.फु. प्रवाही वळण योजना आहेत. प्रवाही योजनांपैकी १४ योजना (१.०७ अ.घ.फु.) पूर्ण करण्यात आल्या असून, ५ योजना (१.३६ अ.घ.फु.) बांधकामाधीन आहेत व १२ योजना (५.९८ अ.घ.फु.) सर्वेक्षण /अन्वेषण/प्रकल्प अहवाल तयार करण्याच्या विविध टप्प्यात प्रगतीत आहे.

उपसा वळण योजनेपैकी पार-गोदावरी नदीजोड योजनेचा (३.४२ अ.घ.फु) प्रकल्प अहवाल तयार झालेला असून राज्य तांत्रिक सल्लागार समितीकडे तपासणीत आहे. दमणगंगा-वैतरणा-गोदावरी (७.१३ अ.घ.फु.), दमणगंगा-एकदरे-गोदावरी (५.०० अ.घ.फु.) प्रकल्पाचे सविस्तर प्रकल्प अहवाल राष्ट्रीय विकास अभिकरण, नवी दिल्ली मार्फत तयार करण्यात येत असून जून, २०२२ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे. वैतरणा व उल्हास नदीखोऱ्यातून गोदावरी खोऱ्यात पाणी वळविणेबाबतच्या योजना सर्वेक्षणाधीन आहेत.

उपरोक्त प्रमाणे कार्यवाही प्रगतीत असल्याने गोदावरी खोऱ्यात नदयांचे पाणी वळविण्याच्या योजनांना विलंब होण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(३) उपरोक्त प्रमाणे कार्यवाही प्रगतीत असल्याने शासनाने चौकशी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

उपरोक्त नदीजोड योजनांचे सविस्तर प्रकल्प अहवाल तयार झाल्यानंतर त्यास राज्य तांत्रिक सल्लागार समिती, नाशिक यांची मान्यता तसेच महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम २००५ कलम ११ (च) अंतर्गत महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाची मान्यता प्राप्त झाल्यानंतर, राज्याच्या आर्थोपायाची स्थिती व मा.राज्यपाल महोदयांचे निदेश यानुसार प्रशासकीय मान्यता देणे शक्य आहे. त्यानुसार पुढील कार्यवाही प्रगतीत असून सदरील नदीजोड योजनांना प्रशासकीय मान्यता दिल्यानंतर निधीची तरतूद करणे शक्य आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यास आपत्कालीन कोविड प्रतिसाद पॅकेज अंतर्गत प्राप्त निधी खर्च करण्याबाबत

**(३) * १२७६० श्री.सुजितसिंह ठाकूर, श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रामदास आंबटकर, डॉ.परिणय फुके, श्री.प्रवीण दटके, श्री.रमेश कराड, श्री.रमेशदादा पाटील, डॉ.रणजित पाटील, श्री.राजहंस सिंह :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कोरोना साथीच्या पार्श्वभूमीवर केंद्र शासनाने राज्यांना लस व औषधांसह वाढीव निधी दिला जात असतानाही शासनाचे काम संथगतीने सुरु असल्याची बाब मा.केंद्रीय सार्वजनिक आरोग्य मंत्री यांनी घेतलेल्या आढावा बैठकीत निदर्शनास आली असून कोरोना आणि ओमायक्रॉनमुळे रुग्णांची संख्या वाढली तर काय काळजी घ्यायला हवी याबाबतच्या सूचनाही दिल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्रीय आरोग्य मंत्रालयाच्यावतीने इमर्जन्सी कोविड रिस्पॉन्स पॅकेज अंतर्गत राज्याला पहिल्या टप्प्यात रुपये १९८५.१२ कोटी तर दुसऱ्या टप्प्यात रुपये ८२०.७७ कोटींचा निधी वितरित केला असून दुसऱ्या टप्प्यातील रुपये ८२०.७७ कोटींमधून रूपये ४१०.३९ कोटी खर्च केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, माहे मार्च, २०२२ अखेरपर्यंत संबंधित निधी खर्च करण्याची मुदत असल्याने उर्वरित निधी खर्च करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे :** (१) मा.केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री यांनी सूचना दिल्या हे खरे आहे. परंतु राज्य शासनाचे काम संथगतीने सुरु आहे, हे खरे नाही.

(२) राज्याने ECRP-I पॅकेज मधील प्राप्त रुपये ११८५.१२ कोटी निधीपैकी रुपये ११४९.५१ कोटी म्हणजेच ९६.६४% निधी खर्च करण्यात आला असून उर्वरित निधी प्रयोगशाळा मनुष्यबळासाठी राखीव ठेवण्यात आला आहे.

तसेच ECRP-II अंतर्गत प्राप्त रुपये ६८३.९८ कोटी निधीपैकी रुपये २२१.७० कोटी म्हणजेच ३१.२१% निधी खर्च करण्यात आला असून उर्वरित निधी दिनांक ३१ मार्च, २०२२ पर्यंत खर्च करण्याचे नियोजन आहे.

(३) केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार आणि मंजूर प्रकल्प आराखड्यानुसार सर्व जिल्ह्यांना निधी विनियोगाच्या सूचना दिल्या आहेत व आवश्यक निधी वितरित केला आहे. निधी विनियोगाबाबत राज्य स्तरावरुन नियमित आढावा घेण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात रोबोटिक सर्जरी प्रणाली कार्यान्वित करण्याबाबत

**(४) * १२६१८ श्री.प्रवीण दटके, श्री.नागोराव गाणार, श्री.रामदास आंबटकर, डॉ.परिणय फुके, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रमेश कराड, श्री.निलय नाईक, ॲड.निरंजन डावखरे, श्री.चंद्रशेखर बावनकुळे : तारांकित प्रश्न क्रमांक १०७०९ ला दिनांक २३ डिसेंबर, २०२१ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर येथे रोबोटिक सर्जरी प्रणाली खरेदीकरीता हाफकीन महामंडळाकडून निविदा प्रक्रिया प्रसिध्द करुनही निविदेच्या अटी व शर्तीची पुर्तता होत नसल्याने, पुनर्निविदा सुचना प्रसिध्द करण्यात आलेली असून सदर यंत्र खरेदीची सुरु असलेली कार्यवाही पूर्ण झाली आहे काय,

(२) असल्यास, दिनांक २० ऑगस्ट, २०१९ रोजी वैद्यकीय महाविद्यालयामार्फत हाफकीन मंडळाकडे रुपये १८ कोटींचा निधी वर्ग करण्यात आला असून खरेदी प्रक्रिया पूर्ण झाली नसल्याची बाब माहे डिसेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर येथे रोबोटिक सर्जरी प्रणाली कार्यान्वित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अमित विलासराव देशमुख :** (१) नाही.

सदर यंत्र खरेदीसाठी हाफकीन महामंडळस्तरावरुन निविदा अंतिम करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) शासनाच्या विहित नियमानुसार हाफकीन महामंडळामार्फत तीन वेळा निविदा प्रक्रिया राबवूनही तांत्रिक कारणास्तव खरेदी प्रक्रिया पूर्ण झाली नाही, तथापि, चौथी वेळ पुनर्निविदा प्रक्रिया राबवून सहभाग दर्शविलेल्या व न्युनतम दर असलेल्या निविदाकाराकडून निविदा अंतिम करण्याची कार्यवाही सुरु आहे. सबब, झालेला विलंब तांत्रिक कारणास्तव झाल्याने चौकशीचा प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंगी (ता.शेवगाव, जि.अहमदनगर) येथील जायकवाडी उजवा कालवा वितरीका क्रमांक पाचमधील चारी व चारीचा रस्ता बुजवून शासकीय मालमत्तेचे नुकसान केल्याबाबत

**(५) * १२१९९ श्री.रामराव पाटील : दिनांक २३ डिसेंबर, २०२१ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ९ मधील प्रश्न क्रमांक ९८९२ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंगी (ता.शेवगाव, जि.अहमदनगर) येथील गट नंबर ४१२/४१३ मधील जायकवाडी उजवा कालवा वितरीका क्रमांक पाचमधील चारी व चारीचा रस्ता बेकायदेशीर जेसीबीच्या सहाय्याने बुजवून शासकीय मालमत्तेचे नुकसान झाल्याप्रकरणी क्षेत्रिय कार्यालयाकडे प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली आहे,

(२) असल्यास, सदर प्रकरणी कार्यकारी अभियंता जा.पा.वि.क्र.३, बीड व तहसिलदार, शेवगाव ह्यांनी केलेल्या प्रत्यक्ष स्थळ पाहणीत सदरील रस्ता नादुरुस्त स्थितीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रस्ता व चारी काढून शासकीय जमिनीवरील काही ठिकाणचे अतिक्रमण काढले असून गट नंबर ४१२/४१३ मध्ये शेतकऱ्याचे नाव निदर्शनास येऊनही त्यांच्याविरुध्द कोणत्याही प्रकारची कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संबंधित दोषींवर कारवाई करून शासकीय जमिनीवरील अतिक्रमण दूर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयंत पाटील :** (१) संबंधितांना नोटीस बजावण्यात आली असून चारी व रस्ता पूर्ववत करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) हे खरे नाही.
संबंधितांना नोटीस बजावण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
संबंधित अतिक्रमण काढून चारी व रस्ता पूर्ववत करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.
(५) कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

-----------------

## मृद व जलसंधारण विभागात “अभियंता” पदाच्या नियुक्तीत झालेल्या गैरप्रकाराबाबत

**(६) * १२६५४ श्री.रमेश कराड, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.नागोराव गाणार, श्री.रमेशदादा पाटील, श्री.संजय दौंड, श्री.विक्रम काळे, श्री.शशिकांत शिंदे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अमोल मिटकरी :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मृद व जलसंधारण विभागात करार पध्दतीने अभियंत्यांच्या नियुक्तीत गैरप्रकार झाला असून निवड झालेल्या उमेदवारांना डावलून अपात्र व प्रतिक्षा यादीमधील तसेच अपूर्ण कागदपत्रे असणाऱ्यांची निवड करण्यात आली असल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नियुक्त्या करण्याचे अधिकार आयुक्त, मृद व जलसंधारण विभाग यांना असतानाही उपायुक्त व निम्नस्तरीय अधिकाऱ्यांनी भरती प्रक्रिया पूर्ण केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपविभागीय अभियंता आणि शाखा अभियंता यांच्या भरती प्रक्रियेत पाच अपात्र उमेदवारांना नियुक्ती आदेश देणे, तसेच निवड झालेले उमेदवार रुजू होणार की नाही याची शहानिशा न करता प्रतिक्षा यादीवरील ७ जणांना नियुक्ती आदेश देणे अशा बोगस नियुक्त्यांमुळे शासनाला २ कोटींचा भुर्दंड सोसावा लागणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, नियमबाह्य नियुक्त्यांमुळे शासनाला सोसाव्या लागणाऱ्या भुर्दंडाबाबत संबंधितांकडून व्याजासह रक्कम वसुलीबाबत कोणती कारवाई केली अथवा करण्यात येत आहे, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने यास जबाबदार असणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शंकरराव गडाख :** (१) होय, हे खरे आहे.

यासंदर्भात दै.पुढारी या वृत्तपत्राच्या मुंबई आवृत्तीमध्ये “जलसंधारण विभागात अभियंता भरतीतही घोटाळा” या मथळ्याखाली बातमी दिनांक ०५/०१/२०२२ रोजी प्रसिध्द झाली होती.

(२) व (३) मृद व जलसंधारण विभागामार्फत ६०० हेक्टर सिंचन क्षेत्रापर्यंतच्या लघुपाटबंधारे योजनांची अंमलबजावणी करण्यात येत असून या नवीन विभागातील पदे मोठ्या प्रमाणावर रिक्त असल्याने शासकीय/निमशासकीय सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या सेवा करार पध्दतीने विवक्षित कामासाठी घेणेबाबतच्या सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णय दिनांक १७/१२/२०१६ मधील तरतुदीनुसार, सेवानिवृत्त जलसंधारण अधिकारी (शाखा अभियंता) व सेवानिवृत्त उपविभागीय जलसंधारण अधिकारी (उपविभागीय अभियंता) यांचे सेवा केवळ विवक्षित कामासाठी करार पध्दतीने उपलब्ध करून घेण्याबाबत शासन मान्यतेने दिनांक २६/३/२०२१ च्या पत्रान्वये आयुक्त, मृद व जलसंधारण (म.रा.) औरंगाबाद यांना कळविण्यात आले होते. त्यानुषंगाने आयुक्त, मृद व जलसंधारण (म.रा.) औरंगाबाद कार्यालयामार्फत

सेवानिवृत्त उपविभागीय अभियंता/शाखा अभियंता या अधिकाऱ्यांना सेवा करार पध्दतीने विवक्षित कामासाठी फेब्रुवारी, २०२१ मध्ये करार पध्दतीने नियुक्त्या देण्यात आलेल्या आहेत.

सदर भरती प्रक्रियेबाबत "पुढारी" या वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या बातमीच्या अनुषंगाने आयुक्त, मृद व जलसंधारण (म.रा.) औरंगाबाद यांना वस्तुनिष्ठ खुलासा सादर करणेबाबत कळविण्यात आले होते. त्यानुसार आयुक्तांनी अहवाल सादर केला आहे. सदर अहवालात सेवानिवृत्त उपविभागीय अभियंता/शाखा अभियंता या अधिकाऱ्यांना सेवा करार पध्दतीने विवक्षित कामासाठी घेण्याच्या प्रक्रियेत प्रशासकीय अनियमितता झाल्याचे नमुद केले असून यासाठी जबाबदार असलेल्या संबंधित तत्कालीन प्रशासकीय अधिकारी, तत्कालीन अधीक्षक व तत्कालीन कनिष्ठ लिपिक यांना आयुक्तांनी निलंबित केले असून तत्कालीन उपायुक्त (प्रशासन) यांना आयुक्तांनी दिनांक २७/१२/२०२१ रोजीच्या आदेशान्वये आयुक्तालयातून एकतर्फी कार्यमुक्त केले आहे.

(४) सदर प्रकरणी आयुक्त, मृद व जलसंधारण (म.रा.) औरंगाबाद यांचेकडून प्राप्त अहवालाच्या अनुषंगाने शासनस्तरावर पुढील कार्यवाही सुरू आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील जिल्हा परिषद अंतर्गत "केंद्र प्रमुख" संवर्गातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(७) * १२४१३ श्री.रामदास आंबटकर, श्री.नागोराव गाणार, श्री.विप्लव बाजोरिया, श्री.सुरेश धस, श्री.कपिल पाटील, श्री.किरण सरनाईक :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मुख्याध्यापक व गटशिक्षण अधिकारी यांची मोठ्या प्रमाणात पदे रिक्त असून जिल्हा परिषद अंतर्गत केंद्रप्रमुख संवर्गातील सरळसेवा व विभागीय स्पर्धा परीक्षाद्वारे भरावयाची ३ हजार पदे रिक्त असल्याचे दिनांक २८ सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्रप्रमुखांची पदे भरण्याबाबत शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शासन निर्णय क्रमांक: पीआरई-२००५/ ४४६०/प्राशी-१, दिनांक २ फेब्रुवारी, २०१०; ग्रामविकास व जलसंधारण विभाग, अधिसूचना, दिनांक १० जून, २०१४ व शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्रमांक :- संकीर्ण - २०१६/प्र.क्र.-१६३ टीनटी-१, दिनांक १६ फेब्रुवारी, २०१८ हे शासन निर्णय व अधिसूचना अस्तित्वात आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त शासन निर्णयांव्दारे केंद्रप्रमुखांची पदे न भरता ती अभावितपणे भरली जात असून केंद्र प्रमुख हे पद जिल्हा तांत्रिक सेवा “क” मध्ये समाविष्ट करण्याची व त्यांना तलाठी व ग्रामसेवक यांच्याप्रमाणे फिरती भत्ता मिळावा याबाबत केंद्रप्रमुख संघटनेकडून मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्य व राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त शिक्षक यांना यापुर्वी दोन जास्तीच्या वेतनवाढ देण्यात येत होत्या परंतु, सन २०१४ पासून वेतनवाढ बंद करण्याची कारणे काय आहेत व उक्त वेतनवाढ पुन्हा सुरू करणार काय,

(५) असल्यास, जिल्हा परिषद केंद्रप्रमुखांना वर्ग दोनच्या पदोन्नतीचा लाभ मिळणेबाबत व सेवानिवृत्तीच्या वेळेस अर्जित रजेच्या रोखीकरण याचा लाभ मिळणेबाबत कार्यवाही न झाल्याची बाब माहे जानेवारी, २०२२ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ :** (१) खरे आहे.

(२) शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या दिनांक ०२/०२/२०१० च्या शासन निर्णयात सूचित केल्याप्रमाणे ग्रामविकास विभागाने दिनांक १०/०६/२०१४ रोजी केंद्रप्रमुख पदांच्या सरळसेवा, विभागीय स्पर्धा परीक्षा व पदोन्नतीने नियुक्तीबाबत महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (सेवाप्रवेश) नियम या नियमामध्ये सुधारणा केलेली आहे.

सद्य:स्थितीत ग्रामविकास विभागाची दिनांक १०/०६/२०१४ ची अधिसूचना व शालेय शिक्षण व क्रीडा विभागाचा दिनांक १६/०२/२०१८ चा शासन निर्णय अस्तित्वात आहे.

(३) केंद्रप्रमुखांच्या संघटनाकडून प्राप्त होणाऱ्या निवेदनामध्ये जिल्हा तांत्रिक सेवा “क” मध्ये समाविष्ट करणे व फिरती भत्ता मिळण्याबाबत मागणी होत आहे, हे खरे आहे.

केंद्रप्रमुखांना शालेय शिक्षण विभागाच्या दिनांक १४/११/१९९४ च्या शासन निर्णयानुसार रुपये २००/- इतका कायम प्रवासभत्ता अनुज्ञेय करण्यात आला होता.वित्त विभागाच्या कायम प्रवासभत्ता दरात दिनांक ३/०३/२०१० च्या शासन निर्णयान्वये सुधारणा करण्यात आली असली तरी सदर दर रुपये १६५०/- केंद्रप्रमुखांना लागू होत नसल्याचे शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने स्पष्ट केले आहे.

केंद्रप्रमुखांना कायम फिरती भत्ता मिळण्यासंदर्भात मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका क्र.३१२/२०१५ दाखल असून त्याबाबतचा निर्णय प्रलंबित असल्याने सदरचे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

(४) राज्य व राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त शिक्षकांना देण्यात येणाऱ्या दोन जादा वेतनवाढींऐवजी रुपये १ लक्ष इतकी ठोक रक्कम देण्याचा निर्णय शालेय शिक्षण विभागाने त्यांच्या दिनांक ०४/०९/२०१४ च्या शासन निर्णयान्वये घेतला आहे. या प्रकरणी नव्याने कार्यवाही प्रस्तावित नाही.

(५) व (६) केंद्रप्रमुख हे पद जिल्हा तांत्रिक सेवेत येत नसल्यामुळे त्यांना वर्ग-२ मधील पदोन्नतीचा लाभ देता येत नाही. तसेच सदरचे पद हे दीर्घ सुट्टी विभागातील असल्याने त्यांना सेवानिवृत्तीच्या वेळेस अर्जित रजा रोखीकरणाचा लाभ अनुज्ञेय नाही. अर्जित रजा रोखीकरणाचा लाभ देण्यात येत नसल्याबाबत मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथे याचिका क्रमांक ४०६८/२०२० दाखल करण्यात आलेली आहे. सदरचे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

----------------

## जिल्हा शल्य चिकित्सक, बीड यांनी केलेल्या गैरव्यवहार व वित्तीय अनियमिततेची चौकशी करण्याबाबत

**(८) * ११८६७ श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा शल्य चिकित्सक, बीड यांनी आपल्या अधिकाराचा गैरवापर करुन पदावर कार्यरत असताना गैरव्यवहार व वित्तीय अनियमितता केली असल्याची बाब दिनांक १ जानेवारी, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हा शल्य चिकित्सक यांनी शासकीय रुग्णालयातील रुग्ण स्वतःच्या रुग्णालयात पाठविणे, रेमडेसिविर इंजेक्शनचा काळाबाजार व बोगस आरोग्य भरती तसेच त्यांच्या खाजगी रुग्णालयात रुग्णांनी केलेली आत्महत्या अशा अनेक प्रकरणाबाबत त्यांच्यावर आरोप दाखल करण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर जिल्हा शल्य चिकित्सक यांनी केलेल्या गैरव्यवहार व वित्तीय अनियमिततेची चौकशी करून त्यांना निलंबित करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ७ जानेवारी, २०२२ रोजी मा.सार्वजनिक आरोग्यमंत्री यांना दिलेले निवेदन शासनास प्राप्त झाले आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीच्या अनुषंगाने जिल्हा शल्य चिकित्सक यांनी केलेला गैरव्यवहार व वित्तीय अनियमिततेची चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे :** (१) होय.

(२) होय.

(३) होय.

(४) या प्रकरणी उपसंचालक, आरोग्य सेवा, लातूर यांनी दिनांक २४/२/२०२२ च्या आदेशान्वये गठीत केलेल्या त्रिसदस्यीय समितीमार्फत चौकशी सुरू आहे. सदर समितीचा अहवाल अद्यापही प्राप्त झालेला नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई आणि उपनगरातील किल्ल्यांसह कोकणातील महत्वाच्या किल्ल्यांचे संवर्धन करण्याबाबत

**(९) * १२५१२ ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, डॉ.रणजित पाटील, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई आणि मुंबई उपनगर परिसरातील एकूण सहा किल्ल्यांच्या विकासाबरोबर त्यांच्या जतन आणि संवर्धनाचे काम पुरातत्व संचालनालयामार्फत करण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईतील सेंट जॉर्ज, शिवडी, वरळी, माहिम, धारावी व वांद्रे या सहा किल्ल्यांचा विकास आराखडा यापूर्वी तयार करण्यात आला आहे, हा आराखडा शासकीय निधीबरोबरच बाहयस्त्रोताद्वारे राबविण्याचे नियोजन करावे असे निर्देश सांस्कृतिक कार्य मंत्री यांनी दिनांक ५ ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास मंत्रालयात झालेल्या बैठकीत संबंधित अधिकाऱ्यांना दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबईतील किल्ल्यांबरोबरच कोकणातील महत्वाच्या किल्ल्यांचे संवर्धन करण्याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अमित विलासराव देशमुख :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) मुंबईतील किल्ल्यांबरोबरच कोकणातील सुधागड, रसाळगड, सिंधुदुर्ग व विजयदुर्ग या किल्ल्यांचे संवर्धन करण्याबाबत निर्णय घेण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील संचालक, आरोग्य सेवा, पुणे कार्यालयातील "राज्य कीटक शास्त्रज्ञ" या पदावरील नियुक्तीबाबत

**(१०) * ११८१५ श्री.गोपिचंद पडळकर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात राज्य कीटक शास्त्रज्ञ या पदावर शैक्षणिक अर्हता नसलेल्या व्यक्तीची चुकीच्या पध्दतीने निवड करण्यात आल्याचे माहे नोव्हेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संचालक, आरोग्य सेवा (हिवताप, हत्तीरोग व जलजन्य रोग), पुणे येथील राज्य कीटक शास्त्रज्ञ यांचे शैक्षणिक अर्हता त्यांच्या पदाकरीता अनुरूप नसून या प्रकरणाची चौकशी करून त्यांच्यावर कारवाई करण्याबाबत प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी, सहाय्यक संचालक हिवताप, कोल्हापूर यांनी मा.सार्वजनिक आरोग्यमंत्री यांना दिनांक ३० नोव्हेंबर, २०२१ रोजी निवेदन दिले होते, हे ही खरे आहे काय,

(३)असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्या निवेदनाच्या अनुषंगाने राज्य कीटक शास्त्रज्ञ या पदासाठी आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हता नसलेल्या व्यक्तीची चुकीच्या पध्दतीने निवड केलेल्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे :** (१) हे खरे नाही, महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत विहित कार्यपध्दती अनुसरुन संबंधित व्यक्तीची राज्य कीटक शास्त्रज्ञ या पदावर निवड करण्यात आलेली आहे.

(२) खरे आहे.

(३) सदर तक्रारीच्या अनुषंगाने संचालक, आरोग्य सेवा, पुणे यांच्या कार्यालयामार्फत करण्यात आलेल्या चौकशीनुसार, संबंधित व्यक्तीची झालेली निवड ही महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून झालेली असून, सदर पदाच्या सेवा प्रवेश नियमानुसार, संबंधित व्यक्तीकडे शैक्षणिक अर्हता आणि संशोधनाचा अनुभव असल्याचे शिवाजी विद्यापीठ, कोल्हापुर यांनी प्रमाणित केले आहे. तसेच, सदर पदाच्या पात्रतेसंदर्भात मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे सार्वजनिक हिताच्या याचिकेद्वारे दाद मागण्यात आली होती. परंतु, मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी सदरील याचिका फेटाळली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मंठा (जि.जालना) येथील उप जिल्हा रुग्णालयाच्या इमारतीचे काम पूर्ण करण्याबाबत

**(११) * १२८४४ श्री.राजेश राठोड :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंठा (जि.जालना) तालुक्याकरीता उप जिल्हा रुग्णालयाची इमारत मंजूर झाली असून, इमारतीचे काम पूर्ण झाले नसल्याची बाब माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अधिकारी व कर्मचारी यांच्या निवासस्थानासह सदर इमारत किती कालावधीत पूर्ण करण्याचे नियोजन आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अधिकारी व कर्मचारी यांच्या निवासस्थानासह उपजिल्हा रुग्णालयाच्या इमारतीचे काम पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे :** (१), (२) व (३) मंठा (जि.जालना) येथील उप जिल्हा रुग्णालयाचे मुख्य इमारत व अधिकारी / कर्मचारी निवासस्थान बांधकामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाकडून जिल्हा शल्य चिकित्सक, जालना यांचे मार्फत उपसंचालक आरोग्य सेवा, औरंगाबाद यांचे कार्यालयास प्राप्त झाले असून सदर अंदाजपत्रक प्रशासकीय मान्यता व निधी उपलब्धतेसाठी आयुक्त, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई यांचेकडून शासनास सादर करण्यात येतील.

सदर अंदाजपत्रकास मान्यता प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्याच्या जलसंपदा विभागातील अनुकंपा तत्वावरील उमेदवारांच्या नियुक्तीबाबत

**(१२) * १२५०० श्री.अभिजित वंजारी :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात जलसंपदा विभागामध्ये अनुकंपा तत्वावर करण्यात येणाऱ्या नियुक्तीच्या प्रतिक्षेत अनेक उमेदवार असल्याचे माहे डिसेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जलसंपदा विभागातील अनुकंपा पात्र उमेदवारांना नोकरी देण्यात आली नसल्याने ३००० पदे रिक्त असल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चौकशीच्या अनुषंगाने जलसंपदा विभागातील अनुकंपा पात्र उमेदवारांना नोकरी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयंत पाटील :** (१) व (२) होय.

जलसंपदा विभागामधील ७ परिमंडळांतर्गत एकूण गट “क' १५८२ व गट “ड' ११८५ अशी एकूण २७६७ इतकी पदे अनुकंपा तत्वावर नियुक्तीच्या प्रतिक्षेत आहेत.
(३) सामान्य प्रशासन विभागाच्या प्रचलित धोरणानुसार अनुकंपा तत्वावर नियुक्ती देण्याची कार्यवाही करण्यात येते. त्यानुसार सन २०१७ पासून सरळसेवा कोट्यातील रिक्त होणाऱ्या पदांच्या २० टक्के पदे अनुकंपा नियुक्तीने भरण्यात येतात.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात विशेषत: विदर्भातील मराठा समाजातील सुशिक्षीत बेरोजगार युवकांना मंजूर झालेले कर्ज वाटपास राष्ट्रीयकृत बँकाकडून विलंब होत असल्याबाबत

**(१३) * १२४८२ डॉ.रणजित पाटील :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात विशेषतः विदर्भात नागपूर, अकोला व अमरावती विभागातील मराठा समाजातील सुशिक्षीत बेरोजगार युवकांना रोजगार उपलब्ध व्हावा ह्या दृष्टीकोनातून अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळांतर्गत विविध

कर्ज योजना लागु करूनही बेरोजगार युवकांना बँका कर्ज मंजूर करीत नसल्याने बेरोजगार लाभार्थी सदर योजनेपासून वंचित राहिल्याचे दिनांक १५ फेब्रुवारी, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर महामंडळातून अनेकांनी कर्ज घेतले परंतु यातील बहुतांश जुन्या खातेदारांनाच कर्जवाटप करण्यात आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, ज्यांना जास्त कर्जाची गरज नाही अशा गरजूंना कर्ज योजनेमधून किमान रुपये ५०,०००/- कर्ज योजना चालू करण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाकडून कर्ज मंजूर करुनही बँकांकडून कर्जवाटप करण्यास विलंब होत असून अशा राष्ट्रीयकृत बँकाकडून कर्जवाटपाबाबत होणाऱ्या विलंबाची चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, त्यानुषंगाने कर्जवाटप विनाविलंब करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अजित पवार :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) हे खरे नाही.

अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळामार्फत यापूर्वी प्रायोगिक तत्वावर थेट कर्ज योजनेची अंमलबजावणी करण्यात येत होती. मात्र लाभार्थ्यांनी कर्ज घेतल्यानंतर परतफेडीकरीता त्यांची असलेली उदासिनता, परतफेडीचे अत्यल्प प्रमाण व या कारणांमुळे शासनास वेळोवेळी कर्ज माफ करण्याची स्थिती आली. सबब, शासनाने दिनांक २१ नोव्हेंबर, २०१७ च्या शासन निर्णयानुसार जुन्या योजना बंद करुन नवीन सुधारीत योजना राबविण्यासाठी मान्यता दिली आहे. महामंडळाच्या योजनांतर्गत कर्ज वाटप करण्यात येत नसून, लाभार्थ्यांनी बँकेकडून घेतलेल्या कर्जावरील व्याज परतावा करण्यात येत आहे.
(४) व (५) अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळामार्फत कोणत्याही लाभार्थ्यांस कर्ज देत नसल्याकारणाने कर्ज वाटपाचा प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात बाळासाहेब ठाकरे रस्ते अपघात विमा योजनेची अंमलबजावणी करण्याबाबत

**(१४) * ११९८९ श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस : तारांकित प्रश्न क्रमांक १०७७५ ला दिनांक २३ डिसेंबर, २०२१ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय दिनांक १४ ऑक्टोबर, २०२० अन्वये स्व. बाळासाहेब ठाकरे रस्ते अपघात विमा योजना राज्यात विमा तत्वावर राबविण्यास मान्यता देण्यात आली असून या शासन निणर्यान्वये योजनेच्या अंमलबजावणीबाबत कार्यपध्दती निश्चित करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेंतर्गत रस्ते अपघातातील जखमी झालेल्या रुग्णाची परिस्थिती स्थिर करण्यासाठी लागणाऱ्या वैद्यकीय सेवा पहिल्या ७२ तासासाठी नजिकच्या अंगीकृत शासकीय किंवा खाजगी रुग्णालयामधुन ७४ उपचार पध्दतीच्या माध्यमातून देण्यात येणार आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासाठी रस्ते अपघातातील मृत्यू व विकलांगता कमी करुन जखमी व्यक्तीचे जीवरक्षण करण्याच्या हेतूने प्रति रुग्ण प्रति अपघात रुपये ३०,०००/- पर्यंतचा खर्च अंतिम केलेल्या पॅकेजच्या दरानुसार या योजनेंतर्गत रुग्णालयास अदा करण्यात येणार असून योजना राबविण्यासाठी Emergency आणि Polytrauma Services देण्याची सोय असणारी शासकीय व खाजगी रुग्णालये अंगीकृत करण्यात येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या योजनेतील ७४ उपचार पध्दतीपैकी ४० उपचार पध्दती या महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व प्रधान मंत्री जन आरोग्य योजनेच्या उपचार पध्दती सोबत जुळत असून उर्वरित ३४ उपचार पध्दती जुळत नसल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी फेरतपासणी करून सदरहू योजनेची तातडीने राज्यात अंमलबजावणी सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, उक्त योजनेच्या अंमलबजावणीस होत असलेल्या विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे :** (१) हे खरे आहे.

योजनेची विमा तत्वावर अंमलबजावणी संदर्भात दिनांक १४ ऑक्टोबर २०२० रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे आहे.

(४) हे खरे आहे.

(५) व (६) शासनस्तरावर योजनेच्या अंमलबजावणी संदर्भातची कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे.

-----------------

## हिंगोली जिल्हा रुग्णालयातील प्रसूती विभागामधील स्त्रीरोगतज्ञ वर्ग-१ व वैद्यकीय अधिकाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(१५) * १२४८७ डॉ.प्रज्ञा सातव, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्हा रुग्णालयातील प्रसूती विभागामधील स्त्रीरोगतज्ञ वर्ग-१ व वैद्यकीय अधिकाऱ्यांची ३ पदे रिक्त असून ५ कंत्राटी डॉक्टरांवरच प्रसूती विभाग सुरु असल्याचे दिनांक १६ डिसेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू विभागात पाणी व स्वच्छतेचा अभाव असून येथे उपचार घेत असलेल्या रुग्णांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चौकशीच्या अनुषंगाने हिंगोली जिल्हा रुग्णालयातील प्रसूती विभागामधील स्त्रीरोगतज्ञ वर्ग-१ व वैद्यकीय अधिकाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत तसेच, पाणी व स्वच्छतेच्या समस्या सोडविण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे :** (१) हिंगोली जिल्हा रुग्णालयामधील प्रसुती विभागामधील स्त्रीरोगतज्ञ वर्ग-१ हे पद रिक्त आहे. तथापि, वर्ग-२ मधील स्त्रीरोगतज्ञाचे ०३ पदे मंजूर असून त्यापैकी ०२ पदे भरलेली आहेत हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) म.वै.आ.से. गट-अ मधील विशेषज्ञ संवर्गातील स्त्रीरोगतज्ञ ची पदे व वैद्यकीय अधिकारी गट-अ (एस-२०) संवर्गातील स्त्रीरोगतज्ञाचे पद भरण्याची कार्यवाही सुरु आहे. सदर प्रसूतीगृहामधील नादुरुस्त पाण्याची टाकी तातडीने बदलण्यात येवून नवीन पाण्याची टाकी बसवण्यात आल्याने पाण्याबाबतची कोणतीही अडचण राहीलेली नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जळगाव जिल्हा रुग्णालयात व्हेंटिलेटर खरेदीत गैरव्यवहार झाल्याबाबत

**(१६) * १२०६९ श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे : तारांकित प्रश्न क्रमांक १०४२८ ला दिनांक २३ डिसेंबर, २०२१ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव जिल्ह्यामध्ये यंत्रणा स्तरावर ३० व्हेंटिलेटर खरेदीमध्ये अनियमितता झाल्या प्रकरणी चौकशी करण्यासाठी जिल्हास्तरावर चौकशी समिती नेमण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू चौकशी समितीने सादर केलेल्या अहवालानुसार पुरवठा केलेले व्हेंटिलेटर तांत्रिक विनिर्देशानुसार नसल्याचे आढळल्यामुळे खरेदी प्रक्रिया रद्द करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तांत्रिक विनिर्देशानुसार व्हेंटिलेटर न पुरविणाऱ्या कंपनीवर आणि सदरहू खरेदीस मान्यता देणाऱ्या जिल्हास्तरावरील अधिकाऱ्यांवर शासनाने चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे :** (१) व (२) होय हे खरे आहे.
(३) पुरवठादाराने निविदेमध्ये नमुद केलेल्या मॉडलपेक्षा वेगळ्या मॉडलची व वेगळ्या क्रमांकाची उपकरणे पुरविल्यामुळे सदर खरेदी प्रक्रियेची चौकशी करण्यात आली आहे. चौकशीमध्ये पुरवठादाराकडुन पुरवण्यात आलेल्या साहित्यामध्ये अनियमितता झाली असल्याने सदर खरेदीचे कंत्राट रद्द करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सार्वजनिक आरोग्य विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(१७) *११९७९ श्री.विक्रम काळे, श्री.बाळाराम पाटील, डॉ.प्रज्ञा सातव : तारांकित प्रश्न क्रमांक १०३३६ ला दिनांक २३ डिसेंबर, २०२१ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात कोविड-१९ संसर्गामुळे आरोग्य सेवेचे महत्व अधोरेखीत झाले असून सार्वजनिक आरोग्य विभागात डॉक्टर्स, परिचारिका व वॉर्डबॉय इत्यादींसारख्या आवश्यक असणाऱ्या कर्मचाऱ्यांची पदे रिक्त असल्याची बाब माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सार्वजनिक आरोग्य विभागातील नियमित पदांपैकी १६९९३ आणि कंत्राटी पदांपैकी १३१५२ अशी ३०१४५ पदे रिक्त असल्यामुळे ग्रामीण व शहरी तसेच अतिदुर्गम भागातील गोरगरीब रुग्णांना उपचारापासून वंचित रहावे लागत असून राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत भरली जाणारी १३१५२ पदे ही रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय
(३) असल्यास, सार्वजनिक आरोग्य विभागात सर्व संवर्गनिहाय किती पदे रिक्त आहेत,
(४) असल्यास, महाराष्ट्र वैद्यकीय आरोग्य सेवा, गट-अ (वर्ग-१) व सामान्य राज्य सेवा, गट-अ मधील रिक्त पदे पदोन्नती व सरळसेवाद्वारे भरण्याची सुरु असलेली कार्यवाही तसेच, गट-क व गट-ड मधील रिक्त पदे भरण्याची अंतिम टप्यात सुरु असलेली कार्यवाही पूर्ण झाली आहे काय व त्याची सद्य:स्थिती काय आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे :** (१) अंशत: खरे आहे.

(२) सार्वजनिक आरोग्य विभागातील नियमित पदांपैकी १७६६२ आणि कंत्राटी पदांपैकी १२३०६ पदे रिक्त असली तरी, नियमित पदांपैकी ३९३४७ पदे व कंत्राटी पदांपैकी ३८९२३ पदे भरलेली असून, त्यांच्यामार्फत ग्रामीण, शहरी व अतिदुर्गम भागातील रुग्ण उपचारापासून वंचित राहणार नाहीत, याची दक्षता घेण्यात येते.

(३) सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ आणि सामान्य राज्य सेवा, गट-अ मधील एकूण १७९५ पदे, महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-ब आणि सामान्य राज्य सेवा, गट-ब मधील एकूण ९९६ पदे, गट-क संवर्गातील एकूण ९३४२ पदे आणि गट-ड संवर्गातील एकूण ५५२९ पदे रिक्त आहेत.

(४) महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ व सामान्य राज्य सेवा, गट-अ मधील पदोन्नतीच्या कोटयातील एकूण ४६४ पदे पदोन्नतीने भरण्याची कार्यवाही शासनस्तरावर सुरु आहे. तर, सरळसेवेच्या कोटयातील एकूण ४५८ पदे भरण्याच्या अनुषंगाने महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत जाहिराती प्रसिध्द करण्यात आलेल्या असून आयोगामार्फत शिफारशी प्राप्त झाल्यानंतर सदरील पदे भरण्यात येतील.

तसेच, गट-क व गट-ड मधील रिक्त पदांच्या भरती प्रक्रिये दरम्यान झालेल्या पेपरफुटी संदर्भात पोलिसांकडून प्राथमिक अहवाल प्राप्त झाला आहे. त्यानुसार संबंधित आरोपींवर खटला दाखल करण्याची कार्यवाही सुरु आहे. पोलिसांकडून अंतिम तपासणी अहवाल प्राप्त झाल्यावर रिक्त पदे भरण्यासंदर्भात आवश्यक ती पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अंधेरी (पू.)(मुंबई) येथील राज्य कामगार विमा आदर्श रुग्णालय सुरु करण्याबाबत

**(१८) * ११७८९ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.विक्रम काळे, श्री.शशिकांत शिंदे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अमोल मिटकरी : तारांकित प्रश्न क्रमांक ३११ ला दिनांक २५ फेब्रुवारी, २०२० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंधेरी (मुंबई) एम.आय.डी.सी. भागातील कामगार रुग्णालयाला दिनांक १७ डिसेंबर, २०१८ रोजी लागलेल्या आगीनंतर आजतागायत रुग्णालय सुरु झाले नसल्याचे माहे डिसेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले असून रुग्णालय सुरु करण्याबाबतची मागणी महाराष्ट्र राज्य रुग्णसेवक आणि श्रमिक कामगार संघटनेचे राज्य सचिव यांनी केंद्रीय कामगार मंत्री व कामगार विमा रुग्णालयाचे महाराष्ट्राचे विभागीय संचालक यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य कामगार विमा आदर्श रुग्णालय, अंधेरीच्या दुरुस्ती व नुतनीकरणाचे काम एन.बी.सी.सी. इंडिया यांना देण्यात आलेले असून सदर रुग्णालयाच्या दुरुस्ती व नुतनीकरणाचे काम माहे जून, २०२० पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित असतानाही अद्याप काम पूर्ण झाले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळाच्या (एमआयडीसी) विविध परवानग्या न मिळाल्यामुळे सदरचे रुग्णालय सुरु करण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय तसेच, सदर रुग्णालयातील कामाला परवानग्या न मिळण्याबाबत व रुग्णालय सुरु न होण्यामागची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कामगार रुग्णालय सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे :** (१) राज्य कामगार विमा आदर्श रुग्णालय, अंधेरी हे दिनांक १७/१२/२०१८ रोजी लागलेल्या आगीनंतर आजतागायत सुरु झालेले नाही, हे खरे आहे. तथापि, महाराष्ट्र राज्य रुग्णसेवक आणि श्रमिक कामगार संघटनेचे राज्य सचिव यांचे निवेदन क्षेत्रिय कार्यालय, राज्य कामगार विमा महामंडळ, मुंबई यांना अप्राप्त आहे.

(२) व (३) “श्रम मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली” यांच्या अधिपत्याखालील “राज्य कामगार विमा महामंडळ, नवी दिल्ली” यांच्यामार्फत राज्य कामगार विमा महामंडळ आदर्श रुग्णालय, अंधेरी हे रुग्णालय चालविण्यात येते. दिनांक १७/१२/२०१८ रोजी लागलेल्या आगीनंतर विविध

परवानग्या घेऊन सदर रुग्णालयाच्या दुरुस्ती व नुतनीकरणाचे काम राज्य कामगार विमा महामंडळ, नवी दिल्ली यांनी नियुक्त केलेल्या केंद्र शासनाच्या उपक्रमाखालील "मे.एन.बी.सी.सी., लि." संस्थेमार्फत सुरु आहे. सदर रुग्णालय बंद असल्याने तेथील विमा रुग्णांची गैरसोय होऊ नये म्हणून राज्य कामगार विमा योजना रुग्णालय, कांदिवली येथे रुग्णसेवा सुरु आहे.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## शासकीय/ निमशासकीय शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना भविष्य निर्वाह निधीतून (पी.एफ.) रक्कम काढण्यासाठी येणाऱ्या त्रुटी दूर करण्याबाबत

**(१९) * १२८०० श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भविष्य निर्वाह निधीतून (पी.एफ.) रक्कम काढण्यासाठी येणाऱ्या त्रुटी दूर करण्याबाबत अर्थसंकल्प वितरण प्रणाली (बी.डी.एस.) सुरु करण्याचे निदेश मा.उपमुख्यमंत्री यांनी दिले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासकीय/ निमशासकीय शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या मुलांचे उच्च शिक्षण, लग्न इत्यादी कारणासाठी भविष्य निर्वाह निधीच्या (पी.एफ.) खात्यामधून रक्कम वेळेवर मिळत नाही, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय चौकशीच्या अनुषंगाने भविष्य निर्वाह निधीतून (पी.एफ.) रक्कम काढण्यासाठी येणाऱ्या त्रुटी दूर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अजित पवार :** (१), (२), (३), व (४) भविष्य निर्वाह निधीच्या रकमा लोकलेख्यातील लेखाशिर्षामधून-राज्य शासकीय कर्मचारी भविष्य निर्वाह निधी (वर्ग-४ व्यतिरिक्त)-८००९००१९, वर्ग-४ करीता ८००९०१३५ या लेखाशिर्षामधून तर शालेय शिक्षण विभागाच्या अधिनस्त माध्यमिक शाळेच्या शिक्षकांचे भनिनि-८३३६००३८, प्राथमिक शाळेच्या शिक्षकांचे ८३३६०१५४ आणि ग्रामविकास विभागाच्या अधिनस्त जिल्हा परिषदेतील प्राथमिक शिक्षकांचे

८३३६००११ या लेखाशिर्षातून रकमा काढण्यात येतात.

वरील लेखाशिर्षाखाली सन २०२१-२२ या आर्थिक वर्षात संबंधित विभागाने सादर केलेल्या अर्थसंकल्पीय अंदाजानुसार निधी अर्थसंकल्पीत व १०० टक्के निधी वितरित करण्यात आलेला आहे. तसेच शालेय शिक्षण विभागासाठीच्या लेखाशीर्ष ८३३६००३८ व ८३३६०१५४ अंतर्गत १०० टक्के वितरित निधी अपुरा पडत असल्याने विभागाच्या विनंतीनुसार अतिरिक्त निधी उपलब्ध करून देण्यात आलेला आहे.

-----------------

## मुरूड (जि.रायगड) तालुक्यातील खार आंबोली धरणाच्या उजव्या व डाव्या तीर कालव्याचे काम पूर्ण करण्याबाबत

**(२०) * १२१९७ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुरूड (जि.रायगड) तालुक्यातील खार आंबोली धरणाच्या उजव्या व डाव्या तीर कालव्याचे काम सहा वर्षांपासून बंद आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुरूडसह परिसरातील १२ ते १५ गावातील शेतीला पाणीपुरवठा करण्यासाठी आंबोली धरण उजवा तीर कालव्याचे ७.१० किलोमीटरपैकी ६.१० किलोमीटर काम अपूर्ण आहे, तर डाव्या तीर कालव्याचे २.६४ किलोमीटरपैकी १.६४ किलोमीटर इतके काम अपूर्ण आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, खार आंबोली धरणातून उजवा व डाव्या तीर कालव्यातून पाणी पुरविण्यात आल्यास सुमारे ६०० हेक्टर क्षेत्र ओलिताखाली येऊ शकते तसेच स्थानिक शेतकऱ्यांना दुबार पिकासाठी हे पाणी उपयुक्त ठरणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मुरूड तालुक्यातील खार आंबोली धरणाच्या उजव्या व डाव्या तीर कालव्याचे काम पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयंत पाटील :** (१) होय.

(२) होय.

(३) खरे आहे.

(४) आंबोली लघु पाटबंधारे प्रकल्पास सुधारित प्रशासकीय मान्यता आवश्यक असून प्रकल्पाच्या व्दितीय सुधारित प्रशासकीय मान्यता प्रस्तावाबाबत नियोजन विभाग तसेच वित्त विभागाने उपस्थित केलेल्या मुद्यांची पूर्तता करण्याची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर सुरु आहे. सदर व्दितीय सुप्रमा अहवालात अंबोली धरणाच्या उजव्या व डाव्या तीर कालव्याच्या उर्वरित कामांचा समावेश असून प्रकल्पास व्दितीय सुधारित प्रशासकीय मान्यता प्राप्त झाल्यानंतर कालव्याचे उर्वरित काम निधी उपलब्धतेनुसार दोन वर्षात पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील ग्रामिण व शहरी भागामध्ये लोकसंख्येच्या प्रमाणानूसार आरोग्यविषयक पायाभूत सुविधा निर्माण करण्याबाबत

**(२१) * १२६५८ श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील : दिनांक २३ डिसेंबर, २०२१ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक १३ मधील प्रश्न क्रमांक ८६७१ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या ग्रामीण भागात लोकसंख्येच्या प्रमाणानुसार नवीन ३४४ प्राथमिक आरोग्य उपकेंद्रे, ४७१ प्राथमिक आरोग्य केंद्रे व २१० ग्रामीण रुग्णालये तसेच, शहरी भागात लोकसंख्येच्या प्रमाणानुसार नवीन ६२७ प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि ५८ मोठी रुग्णालये उभारण्याची आवश्यकता असल्याचे जन आरोग्य अभियानांतर्गत करण्यात आलेल्या सर्वेक्षणातुन निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने जनतेच्या आरोग्याच्यादृष्टीने महत्वाचे असलेल्या संबंधित आरोग्य विषयक पायाभुत सुविधा व मोठी रूग्णालये उभारण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंवाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे :** (१) हे अंशत: खरे आहे.

राज्यात वाढीव लोकसंख्या व अंतराच्या निकषाच्या आधारे आरोग्य संस्था निर्मितीचा अनुशेष शिल्लक आहे. ही बाब खरी आहे.
(२) सन २०११ च्या जनगणनेच्या आधारे तसेच सन २०२१ च्या अपेक्षित लोकसंख्येच्या आधारे राज्यातील वाढीव लोकसंख्या व आरोग्य संस्थांमधील अंतर या निकषावर आधारित जोड बृहत आराखडा तयार करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पात्रुड (ता.माजलगाव, जि.बीड) येथील ग्रामपंचायतीच्या निधीमध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत

**(२२) * १२२०४ श्री.सुरेश धस :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पात्रुड (ता.माजलगाव, जि.बीड) येथील ग्रामपंचायतीच्या इमारत बांधकामासाठी मागविलेली निविदा, ग्रामनिधी, वित्त आयोग व पाणीपुरवठा या योजनांमध्ये गैरव्यवहार झाल्याची तक्रार जिल्हाधिकारी, बीड यांच्याकडे दिनांक २३ नोव्हेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासन धोरणानुसार मातोश्री योजनेद्वारे रुपये १२ लक्ष व १४ व्या वित्त आयोगातून रुपये ७१ लक्ष असे एकूण रुपये ८३ लक्ष ४४ हजार ९३६ निधी प्राप्त झालेला असताना सदर इमारत बांधकामाची निविदा मर्जीतल्या

व्यक्तीला देण्यासाठी अटी व शर्तीचा भंग करण्यात आला असून अनामत रक्कम कामाचा कार्यारंभ आदेश झाल्यानंतर भरण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सरपंच व ग्रामसेवक यांनी पात्रता व अनुभव नसलेल्या ठेकेदाराला व गुत्तेदाराला सदर इमारतीचे बांधकाम दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर बांधकाम विहित मूदतीत पूर्ण न करणे, सदोष निविदा प्रक्रिया रद्द न करता उक्त सरपंच व ग्रामसेवक यांनी गैरव्यवहार करून अपात्र निविदा धारकांना काम मंजूर करणे, तसेच निविदा भरल्यानंतर अनामत रक्कम ग्रामपंचायत खात्यावर जमा केलेली नसून एका निविदेची नोंदणी कालावधी संपलेला असतानाही त्यास पात्र केले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सन २०१७ ते सन २०२१ या कालावधीत ग्रामपंचायतीचे उत्पादनातील रूपये ५० लक्ष निधी व १४ व १५ व्या वित्त आयोगातून मिळालेल्या निधीतून नियमबाह्य किर्द व प्रमाणके तयार करुन त्याची बोगस देयके देणे, पाणीपुरवठा योजनेच्या वीज जोडणीमध्ये गैरप्रकार तसेच कंत्राटदाराकडून कपात केलेली जी.एस.टी. ची रक्कम ग्रामपंचायतीच्या खात्यावर भरलेली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संबंधित सरपंच व ग्रामसेवक यांच्यावर कारवाई करुन गैरव्यवहाराची रक्कम वसूल करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ :** (१) होय हे खरे आहे.

तक्रारदाराने दिनांक २३/११/२०२० रोजी गैरव्यवहाराबाबत जिल्हाधिकारी, बीड यांचेकडे तक्रार दिली होती. मात्र, त्यानंतर सदर तक्रारदाराने दिनांक १२/१/२०२१ रोजी लेखी देऊन माझी याबाबत तक्रार नसल्याचे जिल्हाधिकारी, बीड यांना कळविलेले आहे.

(२) होय हे अंशत: खरे आहे.

मा.बाळासाहेब ठाकरे स्मृती मातोश्री योजनेतुन १४.४० लक्ष व ग्रामपंचायतीने स्वनिधी रु ३.६० लक्ष, १४ वा वित्त आयोगातून ४४.८६ लक्ष तसेच ग्राम निधी मधुन रुपये २७.६४ लक्ष निधी मंजूर केला गेला अशी एकूण ९०.५० लक्ष रुपये निधीची तरतुद करण्यात आली होती. ग्रामपंचातयतीमार्फत बांधकामाबाबत ई निविदा दिनांक १२/०३/२०२० ते दिनांक १९/०३/२०२० प्रसिध्द करण्यात आली होती. या कालावधीत एकही ई-निविदा पात्र निविदाधारकाकडून प्राप्त झाली नाही. तद्‌नंतर ग्रामपंचायतीने सदर इ-निविदेस दिनांक २१/०३/२०२० पर्यंत मुदतवाढ दिली. सदर मुदतवाढीच्या कालावधीत निविदाधारक श्री.विनोद देवीदास शिंदे, जालींदर कंन्ट्रन्शन व आरोही सोल्युशन यांनी निविदा भरली. या पात्र निविदा धारकापैकी श्री.विनोद देवीदास शिंदे यांच्या निविदेचे दर इतरांपेक्षा कमी असल्याने ग्रामपंचायतीने संबंधितास बांधकामाचे कंत्राट दिले. सदर कामास ग्रामपंचायतीने कार्यारंभ आदेश दिनांक २७/०३/२०२० रोजी दिला. परंतु सदर कालावधीत लॉकडाऊन परिस्थिती असल्याने वित्तीय व्यवहार बंद असल्याने कंत्राटदारास अनामत रक्कम भरता आली नाही. ती संबंधिताने दिनांक २०/१०/२०२० रोजी रक्कम रुपये २.१५ लक्ष सुरक्षा ठेव हे SBI शाखा, बीड चा बॉन्ड कार्यकारी अभियंता क्र.२ कडे जमा केली आहे. सद्य:स्थितीत अनामत रक्कम कार्यकारी अभियंता यांचेकडे जमा आहे.

(३) नाही, हे खरे नाही.

(४) नाही, हे खरे नाही.

(५) नाही, हे खरे नाही.

कंत्राटदाराकडून कपात केलेली जी.एस.टी.ची रक्कम ग्रामपंचायत खात्यावर जमा आहे.

(६) सदर प्रकरणात कोणताही गैरव्यवहार झालेला नसल्याने रक्कम वसुलीची कार्यवाही करण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही.

(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## परभणी जिल्हयातील स्त्री रुग्णालयाच्या इमारतीचे बांधकाम पूर्ण करण्याबाबत

**(२३) * १२११० श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्हयात राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत मंजूर झालेल्या १०० खाटांच्या स्त्री रूग्णालय इमारत बांधकामासाठी रुपये ८ कोटीचा निधी मिळालेला नसल्याने इमारतीचे बांधकाम पूर्ण होऊ शकले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने रूपये ८ कोटी निधी मंजूर करून स्त्री रूग्णालय इमारतीचे बांधकाम पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) जिल्हा आरोग्य सोसायटीने सदरील बांधकाम पूर्ण करण्यासाठी वाढीव रुपये ८.२० कोटी निधीची मागणी केल्यानुसार केंद्र सरकारला दिनांक १/०७/२०२१ रोजी वाढीव निधी मंजूर करण्यास्तव विनंती केली आहे. केंद्र सरकारची अद्याप मंजूरी प्राप्त नसल्यामुळे वाढीव निधीची तरतूद जिल्हा नियोजन मंडळ किंवा इतर स्थानिक स्त्रोतातून करण्याबाबत जिल्हा आरोग्य सोसायटी, परभणी यांना कळविण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वळगाव (ता.भिवंडी, जि.ठाणे) ग्रामपंचायतीच्या हद्दीतील गोदामांमध्ये अग्निसुरक्षेच्यादृष्टीने उपाययोजना करण्याबाबत

**(२४) * १२४२७ श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वळगाव (ता.भिवंडी, जि.ठाणे) ग्रामपंचायत परिसरात असलेल्या प्रेरणा कॉम्पलेक्समधील एका प्लास्टिकची खेळणी व इतर साहित्य साठविण्यात आलेल्या गोदामास दिनांक १६ डिसेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास पहाटेच्या वेळी भीषण आग लागली असून आगीत पाच गोदामे जळून खाक झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गोदामामध्ये ज्वलनशील रासायनिक पदार्थ, द्रव्यासह अनेक प्रकारचा माल सामान साठविण्यात येवून सुरक्षिततेच्यादृष्टीने कोणतीही काळजी घेण्यात येत नसल्याने गोदामांना आगी लागण्याचे प्रकार वारंवार घडत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने गोदामांमध्ये बेकायदेशीर रासायनिक द्रव्यांचा साठा ठेवण्यास निर्बंध घालून गोदामात अग्निसुरक्षेच्यादृष्टीने संभाव्य धोके, जीवित व वित्तहानी यापासून बचाव करण्यासाठी सुरक्षिततेच्यादृष्टीने उपाययोजना करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

तलाठी सजा पुर्णा यांचा दिनांक १५/१२/२०२१ रोजीचा तहसिलदार, भिवंडी यांना सादर केलेला अहवाल व ग्रामपंचायत वळ यांचेकडील दिनांक ११/०२/२०२२ रोजी गट विकास अधिकारी, पंचायत समिती भिवंडी यांना सादर केलेल्या अहवालानुसार उपरोक्त प्रश्नात नमुद केलेली आग ही ज्वलनशील पदार्थामुळे लागली नसून शॉर्टसर्किट मुळे प्लास्टीक खेळणीस लागली होती.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील कुपोषित बालकांना पोषण आहार मिळण्याबाबत

**(२५) * १२२२६ श्री.राजहंस सिंह, श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कुपोषित बालकांच्या संख्येत तीन पटीने वाढ झाल्याची माहिती माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली असून राज्यात राबविण्यात आलेल्या कुपोषित बालकांच्या धडक शोध मोहिमेत एकूण १८ हजार ९१४ अतितीव्र कुपोषित बालके व १ हजार ५७८ बालके दुर्धर आजाराने त्रस्त असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे जिल्ह्यात जिल्हा परिषदेच्या महिला बालकल्याण विभाग आणि आरोग्य विभागातर्फे करण्यात आलेल्या सर्वेक्षण तपासणी मोहिमेत ४०० बालके अतिकुपोषित, १ हजार ६९४ बालके मध्यम कुपोषित तर ५ हजार १८० बालकांना विविध आजार असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर जिल्ह्यात एवढया मोठ्या प्रमाणात कुपोषित बालके आढळण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, राज्य शासनामार्फत कुपोषित बालकांना पोषण आहार दिला जात असून सदर पोषण आहार कुपोषित बालकांपर्यंत पोहोचत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने राज्यातील कुपोषित बालकांच्या संख्येत वाढ होऊ नये यादृष्टीने कुपोषित बालकांना पोषण आहार मिळण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) :** (१) हे खरे नाही.

राज्यामधील मागील ३ वर्षातील कुपोषित बालकांची आकडेवारी खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | महिना | तिव्र कुपोषित बालकांची संख्या |
|---|---|---|
| १ | डिसेंबर, २०१९ | ९५९७८ |
| २ | डिसेंबर, २०२० | ८९१५१ |
| ३ | डिसेंबर,२०२१ | ८१९०४ |

वरील ३ वर्षाची आकडेवारी लक्षात घेता, तीव्र कुपोषित बालकांच्या संख्येमध्ये वाढ झालेली नसून संख्या कमी झालेली आहे. तथापि, ज्यात Severely Acute Malnourished (SAM) बालकांचा शोध घेण्यासाठी महिला व बालविकास विभाग आणि आरोग्य विभाग यांचेमार्फत संयुक्तरीत्या Screening करण्यात येते व Screening मध्ये आढळून आलेल्या SAM बालकांना ग्राम बालविकास केंद्रामध्ये दाखल करण्यात येते. माहे जुलै, २०२१ पर्यंत राज्यात एकूण ६८६१ बालकांना Home Based VCDC मध्ये लाभ देण्यात येत होता, तथापि, माहे ऑगस्ट, २०२१ मध्ये दिनांक १५ ते दिनांक ३१ ऑगस्ट या कालावधीमध्ये महिला व बालविकास विभाग आणि आरोग्य विभाग यांचेमार्फत संयुक्तरीत्या SAM बालकांकरीता विशेष शोध मोहिम संपूर्ण राज्यभर राबविण्यात आली. सदर मोहिमेत खालीलप्रमाणे SAM बालके आढळून आली.

| एकूण | सर्वे मधील ० ते ६ वर्षे वयोगटातील एकूण बालकांची संख्या | सर्वे मधील ६ महिने ते ६ वर्षे वयोगटातील एकूण बालकांची संख्या | ६ महिने ते ६ वर्षे वयोगटातील एकूण बालकांपैकी सर्वसाधारण बालके | ६ महिने ते ६ वर्षे वयोगटातील एकूण बालकांपैकी MAM श्रेणीमध्ये आढळून आलेली बालके | ६ महिने ते ६ वर्षे वयोगटातील एकूण बालकांपैकी SAM श्रेणीमध्ये आढळून आलेली बालके | ६ महिने ते ६ वर्षे वयोगटातील SAM बालकांपैकी आरोग्य समस्या/ दुर्धर आजार असणारी बालके (NRC) मध्ये दाखल |
|---|---|---|---|---|---|---|
| | ५९०२५०९ | ५४६३७४७ | ५०५३१२० | ९७८७६ | १८९१४ | १५७८ |

(२) व (३) आरोग्य विभागातील CHO, वैद्यकीय अधिकारी, RBSK, ANM व अंगणवाडी पर्यवेक्षिका यांचेमार्फत फेर तपासणी करण्यात आलेली आहे. त्यामध्ये २०३ बालके अति तीव्र कुपोषित (SAM) व ११६४ बालके मध्यम कुपोषित (MAM) तसेच २००१ बालके विविध आजारांनी व्याधीग्रस्त आढळून

आलेली आहेत. यामध्ये स्थलांतरीत, ऊसतोड, वीटभट्टी इ. बालकांचा समावेश आहे. कुपोषणाच्या प्रमाणात वाढ झालेली नसून सर्व बालकांची आरोग्य तपासणी करण्यात आली आहे.

(४) हे खरे नाही.

६ महिने ते ६ वर्ष वयोगटातील बालके आणि गरोदर महिला व स्तनदा माता यांना नियमीतपणे आहार पूरवठा सुरु आहे. तसेच, अति तीव्र कुपोषित (SAM) बालकांना Energy Dense Nutritious Food (EDNF) चा पुरवठा करण्यात येतो.

(५) राज्यात कुपोषणाचे प्रमाण कमी करण्याच्या अनुषंगाने वेळोवेळी आढावा घेऊन उपाययोजना करण्यात येतात. सदर उपाययोजना खालीलप्रमाणे आहेत.

१) एकात्मिक बालविकास सेवा योजनेंतर्गत ६ महिने ३ वर्ष वयोगटातील बालकांना, गरोदर, स्तनदा मातांना THR व ३ ते ६ वर्ष वयोगटातील बालकांना गरम ताजा आहार देण्यात येतो.

२) तसेच आदिवासी प्रकल्पामध्ये अमृत आहार योजना सुरु असून ह्या योजनेंतर्गत गरोदर स्तनदा मातांना एक वेळचा चौरस आहार देण्यात येतो.

३) तसेच अमृत आहार योजनेंतर्गत ६ महिने ते ६ वर्ष वयोगटातील बालकांना आठवड्यातून ४ दिवस अंडी व शाकाहारी बालकांना प्रति दिन २ केळी व मांसाहारी बालकांसाठी १ अंडी देण्यात येतात.

४) अमृत आहार योजनेंतर्गत गरोदर, स्तनदा माता यांच्यासाठी प्रति लाभार्थी एक वेळचा चौरस आहारासाठी खर्च रुपये ३५/- व ६ महिने ते ६ वर्ष वयोगटातील बालकांना अंडी/केळी यासाठीचा प्रति लाभार्थी नियमित आहाराव्यतिरिक्त ६/- रुपये खर्च करण्यात येतो.

५) तसेच राज्यातील सॅम बालकांसाठी ग्राम बालविकास केंद्र सुरु करण्यात आली आहेत. ग्राम बालविकास केंद्रामध्ये तीन वेळचा अतिरिक्त आहार व आरोग्य खात्यामार्फत औषधोपचार करण्यात येतात.

६) राज्यात पोषण अभियान अंतर्गत अंगणवाडी केंद्रातील बालकांचा, किशोरवयीन मुली व महिलांचा पोषणाचा दर्जा सुधारण्यासाठी व कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी विविध स्तरावरुन निरंतर शिक्षण वृध्दीदृष्टीकोन (ILA) समुदाय आधारित कार्यक्रम (CBE), रिअलटाईममॉनिटरींग (ICT-RTM) व जनआंदोलन इत्यादी उपक्रम राबविण्यात येत आहेत.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नांदेड जिल्हयातील मनिरामखेड लघुपाटबंधारे प्रकल्पाच्या कामात अनियमितता झाल्याबाबत

**(२६) * १२४६१ श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माहूर (जि.नांदेड) येथील मनिरामखेड लघू पाटबंधारे प्रकल्पाच्या कामात अनियिमितता झाल्याने प्रकल्पाला धोका निर्माण झाला असून प्रकल्पानजीक असलेल्या राज्यमार्ग ते सिंदखेडकडे जाणारा रस्ता तलाव क्षेत्राच्या पाण्याखाली गेला असल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्प सन २०२१ मध्ये पूर्ण करण्यात आला असून प्रकल्पामुळे बाधित झालेल्या गावांचे पुनर्वसन वायफणी येथील वसाहतीमध्ये करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पुनर्वसन केलेल्या वसाहतीमध्ये विविध कामामध्ये अनियमितता झाली असून पुनर्वसन केलेल्या नागरिकांना गैरसोयीला सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मनिरामखेड लघू पाटबंधारे प्रकल्पाच्या कामाची चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संबंधित दोषी कंत्राटदार व अधिकाऱ्यांविरुध्द कारवाई करुन वसाहतीमध्ये नागरिकांना मूलभूत सुविधा देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयंत पाटील :** (१) हे खरे नाही.

प्रकल्पाचे काम जून-२०२१ अखेर पूर्ण करण्यात आले आहे. तद्नंतर सन २०२१ च्या पावसाळी हंगामात धरणात पूर्ण क्षमतेने पाणी साठा करण्यात आलेला आहे. त्यावेळी प्रकल्पास धोका निर्माण झाल्याची कुठलीही बाब निदर्शनास आलेली नाही.

तसेच प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रातून जाणाऱ्या प्रमुख जिल्हा मार्गास (MDR) पर्यायी वळण रस्ता बांधण्यात आला असून रस्त्याची माथा पातळी पूर्ण संचय पातळीच्या १.६० मी. ने वर आहे. या वर्षी धरणात १०० % पाणीसाठा करण्यात आला असून रस्त्यावरील वाहतूक सुरळीतपणे चालू आहे.

(२) होय.

(३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर विभागातील आरोग्य सहाय्यकांच्या पदोन्नतीच्या प्रस्तावाला मान्यता देण्याबाबत

**(२७) * १२३६६ श्री.चंद्रशेखर बावनकुळे, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सार्वजनिक आरोग्य विभागाने सेवा नियमात बदल केल्यामुळे नागपूर विभागातील १२० आरोग्य कर्मचारी आरोग्य सहाय्यक पदापासून वंचित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोरोना काळात महत्वपूर्ण भूमिका पार पाडणाऱ्या आरोग्य कर्मचाऱ्यांना शासनाच्या दिनांक २९ सप्टेंबर, २०२१ रोजीच्या आदेशानुसार पदोन्नती नियमावलीत बदल केल्यामुळे पदोन्नती मिळाली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संचालक, आरोग्य सेवा आयुक्तालय, पुणे कार्यालयाने दिनांक ३० सप्टेंबर, २०२१ पूर्वी पदोन्नतीची प्रक्रिया करण्याबाबत सूचना दिल्यानुसार उपसंचालक, आरोग्य सेवा यांनी मंजुरीसह प्रस्ताव शासनास सादर केला होता, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने नवीन आदेशानुसार सदर प्रस्तावाला मान्यता दिली नसल्याने कर्मचाऱ्यांनी आंदोलन करून वरिष्ठांसोबत झालेल्या चर्चेत जुन्या आरोग्य कर्मचाऱ्यांकरीता पदोन्नतीच्या निकषात शिथीलता आणण्याचा प्रस्ताव शासनास सादर केला होता, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने जुन्या आरोग्य कर्मचाऱ्यांकरीता पदोन्नतीच्या निकषात शिथिलता आणण्याच्या प्रस्तावावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

विभागीय पदोन्नती समितीची बैठक दिनांक २८/०९/२०२१ रोजी झाली व सुधारित सेवाप्रवेश नियम दिनांक २९/०९/२०२१ रोजी निर्गमित झाले आहे.

(३) व (४) हे अंशत: खरे आहे.

दिनांक १५/०९/२०२१ पूर्वी पदोन्नती प्रक्रिया पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. नागपूर विभागातील हिवताप कार्यालयासंबंधी पदोन्नती समितीची बैठक दिनांक २८/०९/२०२१ रोजी घेण्यात आली व या संवर्गाचे सुधारित सेवाप्रवेश नियम दिनांक २९/०९/२०२१ रोजी निर्गमित झाले तोपर्यंत पदोन्नती आदेश निर्गमित न झाल्याने सदर प्रस्ताव शासन स्तरावर सादर करण्यात आला नाही.

(५) सदर प्रकरणी सेवाप्रवेश नियमात सुधारणा प्रस्ताव सादर करण्यासाठी संचालक आरोग्य सेवा पुणे यांनी अभ्यास समिती स्थापन केली आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ओतूर (जि.पुणे) येथील मांडवी नदीवरील बंधाऱ्याचा भराव वाहून गेल्यामुळे परिसरातील शेतीचे नुकसान झाल्याबाबत

**(२८) * १२०२३ श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ओतूर (जि.पुणे) येथील रहाटी मळा येथे जिल्हापरिषदेच्या निधीतून रुपये दीड कोटी खर्चून बांधण्यात आलेल्या मांडवी नदीवरील के.टी बंधाऱ्याचा भराव पाण्याच्या अति दाबाने वाहून गेल्याची घटना माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान घडली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बंधाऱ्याचे पाणी शेतात गेल्याने परिसरातील बागायती पिकांचे व शेतीचे नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त बंधाऱ्याच्या कामाची चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याबाबत व याप्रकरणी जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांविरुध्द कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शंकरराव गडाख :** (१) अंशतः खरे आहे.

सदरचे काम अद्याप पूर्ण झालेले नसून काम चालू असतानाच नदीच्या क्षमतेपेक्षा जास्त पाणी आल्याने को.प.बंधारा लगतचा भराव पाण्याच्या अति दाबाने वाहून गेला.

(२) हे खरे नाही.

कोणाच्याही शेतामध्ये पाणी गेलेले नसल्यामुळे परिसरातील बागायती पिकांचे नुकसान झालेले नाही.

(३) प्रगतीपथावर असलेल्या कामाचा भराव वाहून गेल्यानंतर संबंधित जिल्हा परिषद सदस्य, जिल्हा जलसंधारण अधिकारी, उपविभागीय जलसंधारण अधिकारी व जलसंधारण अधिकारी यांच्याकडून कामाची पाहणी करण्यात आली आहे. त्यानुसार भराव पूर्ववत करण्याचे काम सर्व शेतकऱ्यांच्या संमतीने प्रगतीपथावर आहे. कोणाचेही आर्थिक नुकसान झाल्याचे आढळून आलेले नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वाळूंज (जि.औरंगाबाद) येथील अंगणवाडीतील बालकांना वितरित केलेल्या पोषण आहाराच्या बंद पाकिटात मृत उंदीर आढळल्याबाबत

**(२९) * ११९९९ श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाळूंज (जि.औरंगाबाद) येथील बालविकास प्रकल्प विभागाच्यावतीने अंगणवाडीतील बालकांना देण्यात येणाऱ्या पोषण आहाराच्या बंद पाकिटात मृत उंदीर आढळल्याची घटना माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, धुळे जिल्ह्यातील एका कंपनीकडून सदरहू पोषण आहाराची बंद पाकिटे पुरविली जात आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने बालकांच्या आरोग्याशी खेळणाऱ्या संबंधित पुरवठादार कंपनीविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) :** (१) हे खरे नाही.

औरंगाबाद येथील अंगणवाड्यांमध्ये अंगणवाडी स्तरावर वितरित केलेल्या आहाराच्या बंद पाकीटामध्ये मृत उंदीर आढळून आले नाहीत. तथापि, लाभार्थ्यांच्या घरी पोषण आहाराच्या पाकीटात मृत उंदीर आढळून आल्याची बातमी वृत्तपत्रात प्रसिध्द झाली होती.

(२) व (३) औरंगाबाद जिल्ह्यामध्ये पोषण आहाराचे वाटप कच्चे धान्य व किराणामालाची पाकीटे महाराष्ट्र राज्य ग्राहक महासंघ मर्यादित, मुंबई यांचेमार्फत पुरविली जातात. उक्त प्रकरणी संबंधित बालविकास प्रकल्प अधिकारी यांनी अंगणवाडीस प्रत्यक्ष भेट देवून तपासणी केली असता अंगणवाडीस्तरावर शिल्लक राहिलेली गव्हाची पाकिटे फोडून पाहिली असता गहू चांगल्या स्थितीत होता, कोणत्याही पाकीटाला अथवा गव्हाला मृत उंदराचा वास येत नव्हता. तसेच, सदर अंगणवाडी कार्यक्षेत्रातील ८ ते १० लाभार्थ्यांना आहाराच्या गुणवत्ते विषयी विचाराणा केली असता त्यांची अन्न

धान्य व किराणा मालाबाबत कोणत्याही प्रकाराची तक्रार आढळून आली नाही. तथापि, सदर मालाचे सॅम्पल प्रयोगशाळा तपासणीकरीता पाठविण्यात आले आहे. प्रयोगशाळा तपासणीचा अहवाल आल्यानंतर नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जऊळके राजगुरुनगर (जि.पुणे) येथील रस्त्यांची दुरवस्था झाल्याबाबत

**(३०) * ११७९४ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.नागोराव गाणार, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जऊळके राजगुरुनगर (खु.) (बो-हाडे) (ता.खेड, जि.पुणे) येथील रस्त्यांची दुरवस्था झाली असल्यामुळे गावातील नागरिकांना रहदारी करण्यास त्रास सहन करावा लागत असल्याची बाब माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गावातील मच्छिद्र बो-हाडे ते बोरकुटे रस्ता, जुनावना रस्ता, बेदाडवस्ती रस्ता, गणपती मंदिर ते किसन बो-हाडे यांच्या घरापर्यंतचा रस्ता, चीघर वस्ती रस्ता, दरा ते ठाकरवाडी रस्ता या प्रमुख रस्त्यांची दुरवस्था झाली असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रस्त्यांच्या दुरुस्तीबाबत संबंधित यंत्रणांना तक्रार करुनही शासनाचे याकडे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने जऊळके (खु.)(बो-हाडे) राजगुरुनगर येथील रस्ते दुरुस्त करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ :** (१) व (२) अंशत: खरे आहे. संबंधित ग्रामपंचायतीकडून जिल्हा परिषद, पुणे यांच्याकडे सदर रस्त्याबाबत कोणताही प्रस्ताव प्राप्त नाही. तथापि, सदर प्रकरणी उप अभियंता यांनी पाहणी केली असता रस्त्याची दुरवस्था झाली आहे, हे खरे आहे.

(३) व (४) रस्त्याच्या दुरूस्तीकरीता प्रस्ताव मागविण्यात आला आहे. प्रस्ताव प्राप्त होताच निधी उपलब्धता, शासन निकष यानुसार प्रस्ताव हाती घेण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## गोंदिया जिल्ह्यातील अंगणवाड्यांना सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(३१) * १२४०८ डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.नागोराव गाणार, श्री.निलय नाईक, श्री.प्रवीण दटके, श्री.रमेश कराड, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंदिया जिल्ह्यात महिला व बालविकास विभागामार्फत सुरु करण्यात आलेल्या १२१७ अंगणवाड्यांमध्ये पाण्याची सोय, शौचालयासह अनेक सोयी-सुविधांचा अभाव असल्याचे माहे डिसेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अंगणवाड्यांमध्ये विकास कामांकरीता कोट्यवधी रुपयांचा निधी मंजूर होऊनही सोयी-सुविधा उपलब्ध करुन दिल्याचे कागदोपत्री दाखवून विकास कामांच्या निधीचा अपहार होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने विकास कामांच्या निधीचा अपहार करणाऱ्या दोषींवर कारवाई करुन गोंदिया जिल्ह्यातील अंगणवाड्यांना सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

गोंदिया जिल्ह्यात ग्रामीण व आदिवासी क्षेत्रात महिला व बालविकास विभागामार्फत सुरु करण्यात आलेल्या नियमित अंगणवाडी केंद्र १५६८ व मिनी अंगणवाडी केंद्र २३७ असे एकूण १८०५ अंगणवाडी केंद्र कार्यरत असून सदर अंगणवाड्यांपैकी जलजीवन मिशन अंतर्गत १३८९ अंगणवाड्यांना

ग्रामपंचायतद्वारे नळ जोडणी झालेली आहे. उर्वरीत ४१६ अंगणवाडी केंद्रांना जलजीवन मिशन अंतर्गत नळ जोडणीची कार्यवाही संबंधित ग्रामपंचायतद्वारे करण्यात येत आहे.

तसेच १५३५ अंगणवाडी केंद्रांना शौचालय सुविधा आहे. उर्वरित २७० अंगणवाडी केंद्रांना १५ वा वित्त आयोग व ग्रामपंचायत नियोजनातून टप्या-टप्याने अंगणवाडी शौचालय बांधकाम करण्याचे प्रस्तावित आहे.

सन २०२१-२०२२ या आर्थिक वर्षाकरीता गोंदिया जिल्ह्यातील २०२ अंगणवाडी केंद्रांना पिण्याच्या पाण्याची सुविधा करीता रुपये २०,२०,०००/- व २६ अंगणवाडी केंद्रांना शौचालय बांधकामाकरीता रुपये ३,१२,०००/- इतकी तरतूद उपलब्ध करुन दिलेली आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कराड (जि.सातारा) तालुक्यातील शेकडो एकर क्षेत्र खारफुटीचे झाल्याबाबत

**(३२) * ११८५६ श्री.सदाशिव खोत, श्री.गोपिचंद पडळकर :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कराड (जि.सातारा) तालुक्यातुन वाहणाऱ्या कृष्णा कालव्याद्वारे सिंचित शेत जमिनीत पाण्याचा अति वापर झाल्यामुळे शेकडो एकर क्षेत्र खारफुटीचे झाल्याची बाब माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रेठरे बु., सैदापूर, गोवारे, सयापुर, टेंभू, कोरेगाव, कार्वे, वडगाव हवेली, कोडोली, दुशेरे, शेरे, गोंदी व खुबी येथील शेकडो एकर क्षेत्र खारफुटीने बाधित झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बाधित क्षेत्राला वाचविण्यासाठी कृष्णा कालवा विभाग व शासनाच्या जलनिःस्सारण विभागाने उपाययोजना न केल्याने शेतकऱ्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने शेतकऱ्यांच्या बाधित क्षेत्राला वाचविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयंत पाटील :**(१) हे खरे आहे.

सन २०२०-२०२१ च्या बाधित क्षेत्र अहवालानुसार कराड तालुक्यात एकूण ५६२ हे.(अंशत: खारवट) इतके खराबा क्षेत्र आढळून आले आहे.

(२) हे खरे आहे.

रेठरे बु.,सैदापूर, गोवारे, सयापूर, टेंभू, कोरेगाव, कार्वे, वडगाव हवेली, कोडोली, दुशेरे, शेरे, गोंदी व खुबी या गावांतील एकूण ५६२ हे. (अंशत: खारवट) इतके खराबा क्षेत्र आढळून आले आहे.

(३) कृष्णा कालव्याच्या लाभक्षेत्रातील कराड तालुक्यातील बाधित क्षेत्र (पाणथळ/ खारवट) निर्मुलनासाठी वेळोवेळी उपाययोजना करणेत आल्या असून, कराड तालुक्यात ७ चर योजनांची कामे पूर्ण झालेली आहेत व ३ चर योजनाची कामे प्रस्तावित करण्यात आलेली आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अकोला शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(३३) * ११९६४ श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.संजय दौंड, श्री.अरुण लाड :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अकोला, (जि.अकोला) येथे जिल्हाधिकारी, अकोला यांनी भेट देऊन सध्याच्या कोविड परिस्थितीमध्ये वॉर्डात लागणाऱ्या अतिरिक्त मनुष्यबळाचे व्यवस्थापन करण्याकरीता महाविद्यालयातील पदनिहाय उपलब्ध प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक व प्रयोगशाळा तंत्रज्ञ आदि पदांबाबत आढावा घेतल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हाधिकारी यांनी स्थानिक पातळीवरुन कक्षसेवक, परिचारीका व स्वच्छक यांची पदे कंत्राटी पध्दतीने भरण्याबाबत भरती प्रक्रिया सुरु करावी असेही निर्देश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चौकशीच्या अनुषंगाने महाविद्यालयातील रिक्त पदांकरीता करीता भरती प्रक्रिया सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अमित विलासराव देशमुख :** (१) व (२) होय हे खरे आहे.

(३) जिल्हा शल्यचिकित्सक अकोला मार्फत कोविड-१९ रुग्णांची संख्या लक्षात घेता जशी मनुष्यबळाची आवश्यकता लागेल त्याप्रमाणे मनुष्यबळ पुरविण्यात आले आहे.

(४) लागु नाही.

-----------------

## कोविड-१९ प्रादुर्भावाच्या कालावधीत आरोग्यविषयक साहित्याच्या खरेदीमधील गैरव्यवहाराची चौकशी करण्याबाबत

**(३४) * १२७३८ श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, डॉ.परिणय फुके, श्री.सुरेश धस, डॉ.रणजित पाटील, श्री.सदाशिव खोत, श्री.प्रसाद लाड, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.निलय नाईक, श्री.प्रवीण दटके, श्री.रमेशदादा पाटील, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याणमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरोना काळात झालेल्या खरेदीमधील गैरव्यवहार प्रकरणी चौकशी करण्याबाबत मा.विरोधी पक्ष नेता, विधानपरिषद यांनी मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री यांना दिनांक २ नोव्हेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास पत्र दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त खरेदीमधील गैरव्यवहार प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने दोषींवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे :** (१) हे खरे आहे.

(२) कोविड- १९ च्या अनुषंगाने आवश्यक असलेल्या औषधे, औषधी साहित्य सामुग्री तसेच यंत्रसामुग्री उपकरणे यांची खरेदी राज्य व जिल्हास्तरावर करण्यात आली आहे. कोविड- १९ ची त्यावेळी असलेली परिस्थिती, लॉकडाऊन, दळणवळणास लावण्यात आलेले प्रतिबंध,कोविड-१९ च्या अनुषंगाने आवश्यक असलेल्या औषधे व साहित्याची मोठ्या प्रमाणात वाढलेली मागणी, कच्च्या मालाचा तुटवडा, रुग्णसेवा देणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांना स्व:संरक्षण साहित्याची असलेली उपलब्धता तसेच रुग्णांना अत्यावश्यक औषधे उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता होती. या बाबी विचारात घेऊन पुरवठ्यास तयार असणाऱ्या पुरवठादारांकडून स्थानिक स्तरावर जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखालील समितीच्या मान्यतेने खरेदी करण्यात आलेली आहे.

वरील कारणांमुळे सदर खरेदीस जिल्हयांना वेगवेगळे दर प्राप्त झाल्याचे निदर्शनास आले आहे. परंतु सदर खरेदीमध्ये गैरव्यवहार झाल्याचे दिसुन येत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ठाणे जिल्हयातील नवजात मृत्यू, बालमृत्यू तसेच मातामृत्यूचे प्रमाण रोखण्याकरिता

**(३५) * १२७४५ श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाण्यातील ग्रामीण तसेच आदिवासी पाड्यामध्ये आरोग्याच्या सुविधा पुरविण्यासाठी जिल्हा परिषदेच्यावतीने प्रयत्न केले जात असताना मागील दीड वर्षात ७४१ नवजात बालकांचा तर १२१ बालमृत्यू आणि ११५ मातामृत्यू झाल्याची नोंद आरोग्य विभागाकडे असल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोरोना काळात बालकांसाठी असलेला आरोग्य राष्ट्रीय बाल सुरक्षा कार्यक्रम बंद करण्यात आला असून सदर टीममधील मनुष्यबळ व वाहने कोरोना रुग्णांसाठी देण्यात आल्याने वाहनांची उपलब्धता नसणे, तसेच अंगणवाड्या बंद असणे यामुळे दुर्गम व आदिवासी पाड्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचार होत नसल्यामुळे प्रसूती माता व बालकांना मुंबईत हलविण्यास सांगण्यात आले परंतु, त्यावेळी बस, रेल्वे, खाजगी वाहने व ॲम्ब्युलन्स अशा सोई-सुविधा मिळत नसल्यामुळे ही परिस्थिती निर्माण झाली असल्याची तक्रार मुरबाडच्या श्रमिक मुक्ती संघटनेने शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्य शासनाने राष्ट्रीय आरोग्य अभियान मोहिमेंतर्गत राज्यातील अर्भक मृत्यूदर १० टक्क्यापर्यंत खाली आणण्याचे उद्दिष्ट निश्चित केले असतानाही अर्भक मृत्यूदराचे प्रमाण जास्त आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, ठाणे जिल्ह्यातील नवजात बालके, बालमृत्यू व मातामृत्यू रोखण्याबाबत उपाययोजना करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, मागील दीड वर्षात कोरोना काळात नवजात बालक, बालमृत्यू तसेच मातामृत्यूचे प्रमाण वाढण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने ठाणे जिल्ह्यातील नवजात बालक, बालमृत्यू तसेच माता मृत्यूस परिणामकारक आळा घालण्याच्यादृष्टीने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे :** (१) ठाणे जिल्ह्यातील ग्रामीण तसेच आदिवासी पाड्यांमध्ये मागील दीड वर्षात (माहे ऑगस्ट, २०२० ते माहे जानेवारी, २०२२) १५५ नवजात बालक, ५५ बालमृत्यू व १९ माता मृत्यू झाल्याची बाब निदर्शनास आली आहे.

(२) कोरोना काळात राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रमांतर्गत उपलब्ध मनुष्यबळाचा वापर हा कोविड रुग्णांच्या उपचाराकरीता वापरण्यात आला होता. तथापि, माता व बाल आरोग्य सेवा पुरविण्याच्यादृष्टीने मार्गदर्शक सूचना तसेच पर्यायी आरोग्य सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या होत्या.

(३) राज्य शासनाने निश्चित केलेल्या शाश्वत विकास ध्येयप्राप्ती करण्याकरीता सन २०२५ पर्यंत अर्भक मृत्यूदर १३ प्रती १००० जिवंत जन्म साध्य करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. एसआरएस २०१९ च्या सर्व्हेनुसार राज्याचा अर्भक मृत्यूदर १००० जिवंत जन्मामागे १७ इतका साध्य केला आहे.

(४) शासनाकडे किंवा जिल्हा आरोग्य अधिकारी, ठाणे यांचे कार्यालयाकडे अशी कोणतीही मागणी प्राप्त झालेली नाही.

(५) व (६) नवजात मृत्यू व बालमृत्यू कमी करण्यासाठी खालीलप्रमाणे उपाय योजना करण्यात येतात.:-

अ) बाल आरोग्यासंबंधी योजना :- आजारी नवजात बालकांच्या उपचारासाठी विशेष कक्ष (Special New Born Care Unit-SNCU), नवजात शिशु स्थिरीकरण कक्ष (New Born Stabilization Unit-NBSU), नवजात शिशु कोपरा (New Born Care Corners-NBCC), बाल उपचार केंद्र (Child Treatment Centres-CTC), पोषण पुनर्वसन केंद्र (Nutrition Rehabilitation Centre-NRC), बालमृत्यू अन्वेषण, जंतनाशक (De-worming Drive) व जीवनसत्व “अ” मोहिम, घरच्या घरी नवजात बालकांची काळजी (Home Based New Born Care), १३ व्या वित्त आयोगातंर्गत इंटेन्सिफाईड एचबीएनसी, होम बेस्ड केअर फॉर यंग चाईल्ड (HBYC), जोखीमग्रस्त कार्यक्षेत्रातील आशांमार्फत अतिसार, न्युमोनिया व सेप्सीस या आजारांचे व्यवस्थापन, Mother Absolute Affection (MAA), राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम, अतिसार नियंत्रण पंधरवडा (IDCF), ॲनिमिया मुक्त भारत, नियमित लसीकरण, नवसंजीवनी योजना.

ब) माता आरोग्यासंबंधी योजना :- जननी सुरक्षा योजना, जननी शिशु सुरक्षा कार्यक्रम, मानव विकास कार्यक्रम, प्रधानमंत्री मातृ वंदन योजना, प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व अभियान, सुरक्षित मातृत्व अभियान आश्वासन.

-----------------

## तिलारी (ता.दोडामार्ग, जि.सिंधुदुर्ग) धरणाच्या डाव्या मुख्य कालव्याकरीता संपादीत केलेल्या जमिनीचा मोबदला मिळण्याबाबत

**(३६) * १२३१३ श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तिलारी (ता.दोडामार्ग, जि.सिंधुदुर्ग) धरणाच्या डाव्या मुख्य कालव्याला जोडून बोडदे खोक्रल गावात पाणी देण्यासाठी साटेली, भेडशी व बोडदे गावातील शेतकऱ्यांच्या जमिनीची तातडीने नुकसान भरपाई दिली जाईल असे सांगून सिंधुदुर्ग पाटबंधारे विभागाने जमिनी ताब्यात घेवून कोटयवधी रूपये खर्च करुन काम सुरू केले असून संबंधित शेतकऱ्यांना अनेक वर्षे झाली तरी जमिनीचा मोबदला दिला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बोडदे गावात मायतर कालवा काढून पाणी देण्यासाठी साटेली, भेडशी व बोडदे गावातील पंचवीसपेक्षा अधिक शेतकऱ्यांच्या शेती व बागायती जमीन या कालव्यासाठी संपादीत करून कामाला सुरूवात होऊन बोडदे गावात पाणीपुरवठा सुरू झाला परंतु पाठपुरावा करूनही सदरहू शेतकऱ्यांच्या संपादीत केलेल्या जमिनीचा मोबदला देण्यास कार्यकारी अभियंता, मुख्य अभियंता, पाटबंधारे विभाग, सिंधुदुर्ग हे दिरंगाई करीत असल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संबंधित शेतकऱ्यांना त्याच्या संपादीत केलेल्या जमिनीचा मोबदला देण्यास विलंब होण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(४) असल्यास, सदरहू शेतकऱ्यांनी नुकसान भरपाई मिळणार असल्याने बँकेकडून कर्ज काढले परंतु रक्कम मिळाली नसल्यामुळे बँकेकडून कर्जाबाबत विचारणा केली जात आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चौकशीच्या अनुषंगाने संबंधित शेतकऱ्यांना संपादीत केलेल्या जमिनीचा मोबदला विनाविलंब देण्याबाबत तसेच, मोबदला देण्यास दिरंगाई केल्याप्रकरणी संबंधित अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करून त्यांच्याविरुध्द कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयंत पाटील :** (१) हे अंशत: खरे आहे.

तिलारी आंतरराज्य मोठा पाटबंधारे प्रकल्प, ता.दोडामार्ग जि.सिंधुदुर्ग या प्रकल्पांतर्गत डावा कालव्याला जोडून बोडदे वितरीकेचे काम प्रस्तावित असल्याने वितरीकेच्या संरेखेत येणाऱ्या भूधारकांची तोंडी संमती घेवून लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांच्या मागणीनुसार सन २०१० नंतर वितरीकेचे काम करून सिंचनासाठी नियमित पाणीपुरवठा सुरू करणेत आला आहे. भुसंपादन प्रक्रिया २०१० नंतर सुरू असताना भुसंपादन कायदा (नवीन भुसंपादन कायदा २०१३) २०१३ मध्ये नव्याने प्रसिध्द झाल्याने सुधारीत भुसंपादन कायद्यान्वये भुसंपादन प्रक्रिया नव्याने सुरू करावी लागली व त्यामुळे भुसंपादन मोबदला भुधारकांना मिळणेस विलंब झाला. सद्य:स्थितीत, जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग यांचे अध्यक्षतेखालील समितीकडून जमिनीची दर निश्चिती करून मिळाली असून मोबदला वाटपाकरीता संपूर्ण निधी प्राप्त आहे व भुधारकांकडून खरेदी खते करुन रुपये ५१०३७५०.०० मोबदला अदा केला आहे व उर्वरीत रुपये २६१६८२४८.०० अदा करण्याची कार्यवाही सुरू आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.

काही भूसंपादन प्रक्रीयेला बराच कालावधी लागला. तथापि, सद्य:स्थितीत भूसंपादन प्रस्ताव अंतिम करणेत आला असून थेट खरेदी खते करण्याच्या शासन निर्णय नुसार व भूधारकांच्या संमतीपत्रांनुसार थेट खरेदीखते करुन मोबदला अदा करणेची कार्यवाही सुरू आहे.
(३) भूसंपादन प्रक्रिया ही शासनाच्या महसूल, जलसंपदा, भुमी अभिलेख, कृषी, वन इ. वेगवेगळ्या विभागांमार्फत केली जात असल्यामुळे तसेच मध्यंतरीच्या काळात २०१३ मध्ये भूसंपादन कायद्यात झालेल्या बदलामुळे सदरच्या प्रक्रियेस विलंब झाला आहे. तथापि, सद्य:स्थितीत, तिलारी डावा

तीर कालवा किमी ०९, सा.क्र.८/४७० मी. वरील मौजे बोडदे, ता.दोडामार्ग या गावातील बोडदे वितरीका किमी १ ते ६ साठी लागणाऱ्या एकूण ५.२६.०० हे. क्षेत्रापैकी ०.८७.५० हे. क्षेत्राचे भूसंपादन पूर्ण झाले असून १० भुधारकांना मोबदला अदा करून थेट खरेदीखताची कार्यवाही पूर्ण करणेत आली आहे. तसेच उर्वरीत भूधारकांकडून आवश्यक कागदपत्रे प्राप्त होताच खरेदीखते करुन मोबदला अदा करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) याबाबत शेतकऱ्यांकडून कोणतेही निवेदन/अर्जाव्दारे माहिती प्राप्त झालेली नाही, तसेच क्षेत्रिय कार्यालयाला कोणताही पत्रव्यवहार केलेला नाही.

(५) भूसंपादन प्रक्रिया पूर्ण झाली असून सद्य:स्थितीत, थेट खरेदी प्रक्रियेद्वारे भूधारकांना मोबदला वाटपाची कार्यवाही सुरु असल्याने प्रश्न उद्भवत नाही.

(६) भूसंपादन प्रक्रिया ही शासनाच्या महसूल, जलसंपदा, भुमी अभिलेख, कृषी, वन इ. वेगवेगळ्या विभागांमार्फत केली जात असल्यामुळे तसेच मध्यंतरीच्या काळात भूसंपादन कायद्यात झालेल्या बदलामुळे सदरच्या प्रक्रियेस विलंब झाला आहे. तथापि, सद्य:स्थितीत, तिलारी डावा तीर कालवा किमी ०९, सा.क्र.८/४७० मी. वरील मौजे बोडदे, ता.दोडामार्ग या गावातील बोडदे वितरीका किमी १ ते ६ साठी लागणाऱ्या एकूण ५.२६.०० हे. क्षेत्रापैकी ०.८७.५० हे. क्षेत्राचे भूसंपादन पूर्ण झाले असून थेट खरेदीखताची कार्यवाही पूर्ण झाली आहे व मोबदला वाटप करण्यात आला आहे. तसेच उर्वरीत भूधारकांकडून आवश्यक कागदपत्रे प्राप्त होताच खरेदीखते करुन मोबदला अदा करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

## नागपूर शहरातील बंद असलेले ऑक्सिजनचे प्लांट सुरु करण्याबाबत

**(३७) * १२९६७ श्री.नागोराव गाणार, श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रामदास आंबटकर, डॉ.परिणय फुके, श्री.प्रवीण दटके, श्री.रमेश कराड, श्री.रमेशदादा पाटील, डॉ.रणजित पाटील, श्री.राजहंस सिंह :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरात हवेतून ऑक्सिजन शोषून घेणाऱ्या २६ प्लांटपैकी ७ पीएसए प्लांट बंद असल्याची बाब माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ऑक्सिजन प्लांट बंद असण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) असल्यास, राज्यात कोरोना रुग्णांची संख्या वाढत असताना बंद असलेले ऑक्सीजन प्लांट सुरु करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे :** (१) हे खरे नाही.

नागपूर शहरातील सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अखत्यारितील शासकीय रुग्णालयांमध्ये एकूण १५ पीएस प्लांट मंजूर असून त्यापैकी १२ प्लांट कार्यान्वित आहेत व ३ प्लांट उभारण्याची कार्यवाही सुरु आहे.

(२) एकही प्लांट बंद नाही. अखिल भारतीय आयुविर्ज्ञान संस्थान नागपूर येथील ३ पीएस प्लांट उभारणीचे काम सुरु असल्याने ते अद्यापही कार्यान्वित नाहीत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील वैद्यकीय अधिकाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(३८) * १३२७७ श्री.अरुण लाड :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कोरोनाचे रुग्ण मोठ्या प्रमाणात वाढत असून वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे रिक्त असल्याची बाब माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात वैद्यकीय अधिकाऱ्यांची किती पदे रिक्त आहेत व पदे रिक्त राहण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चौकशीच्या अनुषंगाने सदर रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे :** (१) व (२) सद्य:स्थितीत महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ (एस-२०) संवर्गातील ८३३५ पदे मंजूर असून त्यापैकी ७९८१ पदे (स्थायी ६९९६, बंधपत्रित २५४ व अस्थायी ७३१) भरलेली आहेत व ३५४ पदे रिक्त आहेत.
(३) रिक्त पदे भरण्याकरीता शासनाने जुलै २०१९ मध्ये ८७७ पदांच्या दिलेल्या जाहिरातीच्या अनुषंगाने ७५४ उमेदवारांना नियुक्ती आदेश देण्यात आले होते. त्यापैकी ५९८ वैद्यकीय अधिकारी रुजू झाले आहेत.

तसेच, एप्रिल २०२१ व ऑगस्ट २०२१ मध्ये अनुक्रमे ८९९ व ११५२ पदांच्या दिलेल्या जाहिरातीच्या अनुषंगाने एकूण १८२७ उमेदवारांना नियुक्ती आदेश देण्यात आले व त्यापैकी १४७९ वैद्यकीय अधिकारी रुजू झाले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील डी.सी.पी.एस/एन.पी.एस धारक कर्मचाऱ्याच्या मृत्यूनंतर कुटुंबास सानुग्रह अनुदान, कुटुंब निवृत्तीवेतन व मृत्यू-नि-उपदान मिळण्याबाबत

**(३९) * १२५९३ डॉ.सुधीर तांबे, श्री.अभिजित वंजारी, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.विक्रम काळे, श्री.बाळाराम पाटील, श्री.राजेश राठोड :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील डि.सी.पी.एस/ एन.पी.एस. धारक कर्मचाऱ्याचा १० वर्षे सेवा पूर्ण होण्याच्या आत मृत्यू झाल्यास सदरहू कर्मचाऱ्याच्या कुटुंबियांना रुपये १० लाख अनुदान दिले जाते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, डि.सी.पी.एस/ एन.पी.एस. कर्मचाऱ्यांना कुटुंब निवृत्ती वेतन (फॅमिली पेन्शन), मृत्यू-नि-उपदान (ग्रॅज्युएटी) या सुविधा मिळत नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कर्मचाऱ्यांची सेवा १० वर्षाहून अधिक झालेली आहे व त्यानंतर त्यांचा मृत्यू झालेला आहे परंतु त्यांना सानुग्रह अनुदान मिळत नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चौकशीच्या अनुषंगाने डी.सी.पी.एस/एन.पी.एस धारक कर्मचाऱ्याची सेवा कीतीही झाली असली तरी त्याचा मृत्यू झाल्यानंतर त्याला सानुग्रह अनुदान, कुटुंब निवृत्ती वेतन (फॅमिली पेन्शन), मृत्यू-नि-उपदान (ग्रॅज्युएटी) मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अजित पवार :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४) व (५) राष्ट्रीय निवृत्तिवेतन योजनेंतर्गत राज्य शासनाच्या सेवेत असताना मृत्यू पावलेल्या कर्मचाऱ्याच्या कुटुंबास कुटुंब निवृत्तिवेतन/मृत्यू-नि-सेवा उपदान तसेच वैद्यकीय कारणास्तव सेवानिवृत्त झाल्यास त्याला रुग्णता निवृत्तिवेतन/ सेवा उपदान अनुज्ञेय करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

-----------------

## राज्यात पदव्युत्तर वैद्यकीय प्रवेश परीक्षा घेण्याबाबत

**(४०) * १२७६१ श्री.सुजितसिंह ठाकूर, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रामदास आंबटकर, डॉ.परिणय फुके, श्री.प्रवीण दटके, श्री.रमेश कराड, श्री.रमेशदादा पाटील, डॉ.रणजित पाटील, श्री.राजहंस सिंह :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात पदव्युत्तर वैद्यकीय प्रवेश परीक्षा न झाल्याने सन २०२१ हे वर्ष शुन्य प्रवेश वर्ष म्हणून नोंद झाल्याची बाब माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, देशातील दर हजारी लोकसंख्येमागे १.३४ डॉक्टर्स उपलब्ध असतानाही सन २०२१ मध्ये वैद्यकीय प्रवेश परीक्षा न घेतल्याने पदव्युतर विद्यार्थ्यांचे मोठ्या प्रमाणात शैक्षणिक नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सन २०२२ या शैक्षणिक वर्षात पदव्युत्तर वैद्यकीय प्रवेश परीक्षा घेण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अमित विलासराव देशमुख :** (१) नाही, हे खरे नाही. सन २०२१-२०२२ या शैक्षणिक वर्षातील वैद्यकीय पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रवेशाकरीता केंद्रशासनामार्फत घेण्यात येणारी "नीट-पीजी" ही पात्रता परीक्षा दिनांक ११/०९/२०२१ रोजी घेण्यात आली होती. सदर परीक्षेचा निकाल २८/०९/२०२१ रोजी प्रसिध्द करण्यात आलेला आहे. दरम्यानच्या कालावधीत ईडब्ल्यूएस आणि ओबीसी कोटयासंदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल झालेल्या याचिकांमुळे सन २०२१-२०२२ ची प्रवेश प्रक्रिया सुरु होण्यास विलंब झाला होता.परंतु, मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक २०/०१/२०२२ रोजी दिलेल्या आदेशानंतर राज्यस्तरीय कोटयाची प्रथम निवड यादी दिनांक २८/०१/२०२२ रोजी राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

(२) नाही, हे खरे नाही. सन २०२१-२०२२ करीता वैद्यकीय पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रंमाच्या प्रवेशाकरीता "नीट-पीजी-२०२१" ही परीक्षा राबविण्यात आली असून त्याबाबतची प्रवेश प्रक्रिया राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत सुरु आहे.

(३) "नीट-पीजी" परीक्षा नॅशनल बोर्ड ऑफ एक्झामिनेशन, नवी दिल्ली यांचेमार्फत आयोजित करण्यात येते. सदर संस्थेने दिनांक ०४/०२/२०२२ रोजी प्रसिध्द केलेल्या नोटीसीनुसार सन २०२२-२०२३ करीता "नीट-पीजी-२०२२" परीक्षा दिनांक २१ मे,२०२२ रोजी आयोजित करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील आदिवासी भागात कार्यरत वैद्यकीय अधिकारी (गट-ब) यांना पदोन्नती तसेच वेतनवाढ देण्याबाबत

**(४१) * १२४०९ श्री.रामदास आंबटकर, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात आदिवासी दुर्गम व बहुल भागात विशेषत: गडचिरोली, चंद्रपूर व वर्धा जिल्ह्यातील ग्रामीण व शहरी भागामध्ये मागील २३ वर्षापासून आरोग्य विभागांतर्गत कार्यरत असलेल्या गट-ब मधील बी.ए.एम.एस. वैद्यकीय अधिकारी पदोन्नती व वेतन वाढीपासून वंचित असल्याची बाब दिनांक ५ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन आदिवासी दुर्गम भागात काम करणाऱ्या गट-ब मधील वैद्यकीय अधिकाऱ्यांना पदोन्नती तसेच वेतनवाढ देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे :** (१) अंशत खरे आहे.

वैद्यकीय अधिकारी गट ब यांना नियमानुसार व पात्रतेनुसार कालबध्द पदोन्नतीने वरची वेतनश्रेणी व वार्षिक वेतनवाढी देण्यात येतात.

(२) सन २०१९ मध्ये ७१८ वैद्यकीय अधिकारी यांचे गट ब मध्ये समावेशन करण्यात आले आहे.

वैद्यकीय अधिकारी गट ब यांना पदोन्नती देण्यासाठी जेष्ठतासुची व बिदूंनामावली तयार करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

पदोन्नतीची संधी उपलब्ध नसल्याने ग्रासलेली कुंठीतता घालवण्यासाठी व होत असलेला विलंब लक्षात घेऊन वित्तविभाग शासन निर्णय क्र. वेतन २००२/प्रक्र१/सेवा ३ दिनांक ११/०१/२००२ नुसार सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ देण्याबाबतचे अधिकार विभाग प्रमुखांना देण्यात आले. त्यानुसार उपसंचालकस्तरावर सदरची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शासकीय रुग्णालय, बीड येथील जीवनामृत रक्त पेढीतील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या गैरव्यवहाराबाबत

**(४२) * ११८६९ श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय रुग्णालय, बीड येथील जीवनामृत रक्त पेढीतील अधिकारी व कर्मचारी हे मनमानी कारभार करून गैरव्यवहार करीत असल्याची बाब दिनांक १ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रक्तदान शिबिरात प्राप्त रक्ताची मागणी केल्यास त्यांच्याकडून सदर अधिकारी व कर्मचारी हे प्रति बॅग रुपये ८५० घेत असणे, रक्तदान शिबिरासाठी प्राप्त रकमेत अपहार करणे व बनावट रक्तदान कार्ड बनविणे असे प्रकार करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासकीय रुग्णालय, बीड येथील रक्त संकलन केंद्रामधील कार्यरत अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कारवाई करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ७ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री यांना निवेदन दिले असून सदर निवेदन शासनास प्राप्त झाले आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चौकशीच्या अनुषंगाने शासकीय रुग्णालय, बीड येथील जीवनामृत रक्त पेढीतील मनमानी कारभार करून गैरव्यवहार करणाऱ्या संबंधितांवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे :**(१) अंशत: खरे आहे.

जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय, बीड यांनी कळविल्याप्रमाणे माहे जानेवारी, २०२२ मध्ये रक्तकेंद्रातील अधिकारी व कर्मचाऱ्यांचा मनमानी कारभार व गैरप्रकाराबाबत तक्रार प्राप्त झाली होती.

(२) अंशत: खरे आहे.

याबाबत जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय, बीड यांचेस्तरावर प्राथमिक चौकशी करण्यात आली असून चौकशीमध्ये अनियमितता आढळल्याने संबंधितांवर नियमानुसार प्रशासकीय कारवाई करण्यात येत आहे.

(३) हे खरे आहे.

(४) जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय, बीड यांनी दिनांक १४/०२/२०२२ रोजी वरील तक्रारीच्या चौकशीसाठी त्रिसदस्यीय समिती गठीत केली होती. सदर समितीचा अहवाल दिनांक २४/०२/२०२२ रोजी प्राप्त झालेला आहे. सदरच्या अहवालानुसार जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय, बीड यांनी रक्तकेंद्रातील कामकाजामध्ये गैरव्यवहार झाले असल्याचे प्राथमिक अनुमान काढले आहे. सदरच्या अहवालावर जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय, बीड यांचेमार्फत पुढील कार्यवाही करण्यात येत आहे. दोषी अधिकारी व कर्मचारी यांचेवर कारवाईची प्रक्रिया जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय, बीड यांचेमार्फत करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पालघर जिल्ह्यातील झांजरोळी (केळवे रोड) धरणाच्या दुरुस्तीबाबत

**(४३) * १२५०१ ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, डॉ.रणजित पाटील :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील झांजरोळी (केळवे रोड) धरणाला दिनांक ८ जानेवारी, २०२२ रोजी भगदाड पडून त्या परिसरातील ८ पाडे व कित्येक चाळीत पूर परिस्थिती निर्माण होऊन मालमत्तेचे नुकसान झाले असून घटनास्थळी पालकमंत्र्यांनी जाऊन परिस्थितीची पाहणी केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशीकरुन सदरहू धरणाच्या दुरुस्तीबाबत व नागरिकांच्या पुनर्वसनाबाबत कोणता निर्णय घेतला व घेण्यात येत आहे तसेच, घेतलेल्या निर्णयाचे थोडक्यात स्वरूप काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयंत पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

दिनांक ८ जानेवारी, २०२२ रोजी माहीम केळवा ल.पा. योजना ता.जि.पालघर येथे मुख्य विमोचकाच्या रेषेतील धरणाच्या प्रवाहाला खालच्या बाजूस ४.०० मी. रुंद भराव ढासळून पोकळी निर्माण झाली.

त्यावेळी धरणावर कोणतीही पुर परिस्थिती निर्माण झाली नसून कोणत्याही मालमत्तेचे नुकसान झाले नाही.

मा.पालकमंत्र्यांनी दिनांक १०/०१/२०२२ रोजी धरणाची पाहणी केली आहे.

(२) धरणाच्या उर्ध्व भागात पोकळी निर्माण झाल्याचे निदर्शनास येताच तात्काळ जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक व तहसिलदार यांना सुचित करण्यात आले.

धरणाखालील गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला व NDRF ची तुकडी तैनात करण्यात आली.

माहिम केळवा ल. पा. योजनेच्या धरणाच्या साखळी क्र. ५७ मी. वर मुख्य विमोचकामधुन प्रवाहच्या खालच्या बाजुच्या मुख्य भिंतीच्या उजव्या बाजूस मोठ्या प्रमाणावर गळती होत होती. धरणाच्या उर्ध्व बाजुस ताडपत्री (Tarpaulin) लावुन त्यावर Sand Bag ठेवण्यात आल्या. त्यामुळे गळतीचे प्रमाण कमी झाले.

तसेच धरणाच्या ऊर्ध्व बाजूस मुख्य विमोचकाच्या व विहिरी भोवती माती भराव व खालच्या बाजूस खडी, वाळू व मातीच्या सहाय्याने धरणाच्या वरील भागातील पोकळी भरण्यात आली. तसेच मुख्य विमोचकाच्या द्वारामधून विसर्ग वाढवून पाणी सोडण्यात आले होते. त्यामुळे धरणातील पाणीसाठा कमी होत गेला. सद्य:स्थितीत धरणातील पाणीसाठा कमी केल्यामुळे धरणाच्या मुख्य विमोचकाच्या (Head Wall) उजव्या बाजूस होणारी पाणी गळती पूर्णपणे बंद झाली आहे.

धरणाच्या दुरुस्तीबाबत.

धरण सुरक्षिततेच्या दृष्टीने माहीम केळवा लघु पाटबंधारे योजनेची दुरुस्ती व पुनर्स्थापना संदर्भातील मातीकाम (Earth work) शिर्ष कामे (Head Work) व इतर कामाचे अंदाजपत्रक प्रादेशिक कार्यालयात मंजूर झाले आहे व सदर काम माहे मे, २०२२ अखेर पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

जलसंपदा विभागाकडून वरीलप्रमाणे कार्यवाही झालेली असल्याने नागरिकांच्या पुनर्वसनाची आवश्यकता नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## किन्हीराजा (ता.मालेगाव, जि.वाशिम) ग्रामपंचायतीमधील सरपंच व सचिव यांच्या गैरकारभाराबाबत

**(४४) * ११८१३ श्री.गोपिचंद पडळकर, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) किन्हीराजा (ता.मालेगाव, जि.वाशिम) ग्रामपंचायतीमधील सरपंच व सचिव यांच्या ग्रामपंचायत नमुना १ ते ३३ मध्ये संगनमताने तफावत निर्माण करणे, मासिक सभा वेळेवर न घेणे, मासिक सभेची हजेरी बुक न ठेवणे यासह अनेक प्रकारच्या अनियमिततेबाबत उपसरपंच व ग्रामपंचायत सदस्यांनी दिनांक ३० नोव्हेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद वाशिम यांच्याकडे तक्रारीचे निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने किन्हीराजा ग्रामपंचायतमधील सरपंच व सचिव यांच्याविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ :** (१) होय, हे खरे आहे.

(२) मुख्य कार्यकारी अधिकारी कार्यालय, वाशिम यांचे पत्र क्र.५९९ दिनांक ०८/०२/२०२२, क्र. ७०३ दिनांक १५/०२/२०२२ अन्वये ग्रामपंचायत किन्हीराजा येथील कामकाजाच्या तक्रारी संदर्भात गट विकास अधिकारी, पंचायत समिती,

कारंजा यांना चौकशी करुन अहवाल सादर करण्यास्तव निर्देश देण्यात आले होते. यास अनुसरून गट विकास अधिकारी, कारंजा यांचेकडून दिनांक २२/०२/२०२२ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी कार्यालयास अहवाल प्राप्त झाला आहे. सदर अहवालान्वये, ग्रामपंचायत किन्हीराजा येथे महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८, कलम ३६ अन्वये मासिक सभा घेतल्याचे आढळून आलेले नाही व जमा खर्चाला सविस्तर बाबनिहाय मंजुरी घेतलेली नाही. तसेच, ग्रामपंचायतने घेतलेल्या ठरावांची अंमलबजावणी केल्याचे दिसुन येत नाही. यामुळे संबंधित सरपंच व ग्रामविकास अधिकारी यांनी कर्तव्यात कसूर केला असल्याचे कळविले आहे.

सदर अहवालाच्या अनुषंगाने सरपंच, ग्रामपंचायत किन्हीराजा यांना महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, कलम ३९ (१) अन्वये सरपंच पदावरुन कमी करण्याबाबतच्या कार्यवाहीकरीता प्रस्ताव विभागीय आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती यांचेकडे दिनांक २२/०२/२०२२ रोजी सादर करण्यात आला आहे. तसेच, संबंधित ग्रामविकास अधिकारी यांना आदेश क्र. ८५५ दिनांक २२/०२/२०२२ अन्वये निलंबित करण्यात आले असून विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाच्या परिसरातील सीसीटीव्ही कार्यान्वित करण्याबाबत

**(४५) * १२७४८ श्री.अभिजित वंजारी :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाच्या २३३ एकर परिसरात लावण्यात आलेले अनेक सीसीटीव्ही बंद असल्याने तेथील विद्यार्थ्यांची सुरक्षा धोक्यात आली असल्याचे माहे नोव्हेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रुग्णालयाच्या परिसरात लावण्यात आलेले सीसीटीव्ही हे निकृष्ट दर्जाचे असून त्यांची देखभाल-दुरुस्ती करण्यात येत नसल्याने बंद पडले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चौकशीच्या अनुषंगाने नागपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाच्या परिसरातील सीसीटीव्ही कार्यान्वित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अमित विलासराव देशमुख :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## औरंगाबाद शहरातील रुग्णालयांमध्ये महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत रुग्णांना उपचार मिळण्याबाबत

**(४६) * १२३४० डॉ.रणजित पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद शहरात महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेची (MJPJY) सुविधा असणाऱ्या रुग्णालयांची संख्या ३७ झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शहरातील एमजीएम, हेडगेवार व कमलनयन बजाज रुग्णालये महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेत रुग्णांवर उपचार करण्यास नकार देत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर योजनेत ५२% खर्च करावयाचा असल्याने औषधोपचाराचा खर्च पूर्ण होत नसल्याने रुग्णांना योग्य उपचार मिळत नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, नॉन कोविड रुग्णांवर कोणत्याच रुग्णालयात उपचार करण्यात येत नसल्याचे माहे मार्च / एप्रिल, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने नॉन कोविड रुग्णावर प्राधान्याने महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेत उपचार करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे :** (१) अंशत: खरे आहे.

औरंगाबाद शहरात महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेत अंगीकृत रुग्णालयांची अद्यावत संख्या एकूण ३९ (शासकीय १० व खाजगी २९) आहे.

(२) हे खरे नाही.

शहरातील महात्मा गांधी मिशन रुग्णालय, डॉ. हेडगेवार रुग्णालय व एम.एम.आर.आय कमलनयन बजाज रुग्णालय हे महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनांतर्गत संलग्नित असून येथे येणाऱ्या रुग्णांमध्ये पात्र रुग्णांचे उपचार महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेंतर्गत होऊ शकतात त्या रुग्णांचे उपचार योजनेंतर्गत मोफत केले जातात, तसेच सदरील तिन्ही रुगणालये योजनेंतर्गत अंगीकृत केल्यापासून आजपर्यंत एकूण ८५३४६ रुग्णांस लाभ देण्यात आलेला आहे, तसेच २०१९ व २०२० दरम्यान सदरील रुग्णालयाबाबत एकूण ४३ तक्रारी प्राप्त झाल्या असून ३९ तक्रारींचे निराकरण करण्यात आले असून ४ तक्रारी निराकरणाच्या प्रक्रियेत आहेत.

(३) हे खरे नाही.

योजनेतील पॅकेजेसमध्ये समाविष्ट होणाऱ्या आजारांसाठी पात्र लाभार्थी रुग्णांस योजनेंतर्गत पूर्णपणे नि:शुल्क उपचार अंगीकृत रुग्णालयांमधून दिले जातात.

(४) हे खरे नाही.

(५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कामा रुग्णालयाच्या निष्काळजीपणामुळे कोरोनाबाधित गर्भवती महिलेचा मृत्यू झाल्याबाबत

**(४७) * ११९८७ श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस : तारांकित प्रश्न क्रमांक १०४२९ ला दिनांक २३ डिसेंबर, २०२१ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरोनाबाधित रुग्ण स्नेहा अशोक मोकाशे या २८ वर्षीय महिलेचा दिनांक १७ मे, २०२१ रोजी कामा रुग्णालयात वैद्यकीय उपचारादरम्यान दुर्दैवी मृत्यू झाल्याप्रकरणी कामा रूग्णालयाच्या प्रशासनामार्फत चौकशी करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणाचा चौकशी अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय, अहवालाची सद्य:स्थिती काय आहे,

(३) असल्यास, चौकशी अहवालातील शिफारसींच्या अनुषंगाने संबंधित गर्भवती महिलेच्या मृत्यूस जबाबदार असलेल्या वैद्यकीय अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अमित विलासराव देशमुख :** (१) होय.

(२) व (३) चौकशी समितीचा अहवाल अद्याप प्राप्त झालेला नसून तो तात्काळ सादर करण्याबाबत आयुक्त, वैद्यकीय शिक्षण यांना कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील आदिवासी व दुर्गम भागातील आरोग्य यंत्रणा बळकट करण्याबाबत

**(४८) * १२३३५ डॉ.प्रज्ञा सातव, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आदिवासी व दुर्गम भागांमध्ये अनेक ठिकाणी प्राथमिक आरोग्य सुविधा उलब्ध नसून माता-मुलांवर उपचार करण्यासाठी रुग्णालये नाहीत, डॉक्टर, आरोग्य अधिकारी, नर्स व दाई अशी अनेक पदे रिक्त असल्याचे दिनांक १९ जानेवारी, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एकात्मिक बालविकास योजनेतील अधिकाऱ्यांकडे दुर्गम भागात प्रवासासाठी वाहने नसल्यामुळे बालमृत्यूचा प्रश्न कायम आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने माहिती व आढावा घेवून राज्यातील आदिवासी व दुर्गम भागात आरोग्य यंत्रणा बळकट करुन बालमृत्यू-मातामृत्यू रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे :** (१) राज्यातील आदिवासी भागातील गावांमध्ये २०५४ उपकेंद्रे, ३७८ प्राथमिक आरोग्य केंद्रे, २८१ भरारी पथके तसेच ग्रामीण रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय व जिल्हा रुग्णालय याद्वारे आदिवासी भागातील लोकांवर, माता व मुलांवर उपचार करण्यात येतात.

नवसंजीवनी कार्यक्षेत्रामध्ये काही पदे रिक्त आहेत, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

एकात्मिक बालविकास सेवा योजना ही केंद्र पुरस्कृत योजना असून या योजनेसाठी प्राप्त होणारा निधी हा Sharing Pattern मध्ये प्राप्त होत असतो. केंद्र शासनाच्या एकात्मिक बाल सेवा योजना मधील अधिकाऱ्यांसाठी स्वत:ची वाहने खरेदी करण्याचे धोरण २०१७-१८ पासून बंद केलेले आहे. त्याऐवजी वाहन भत्त्यासाठी प्रती प्रकल्प रुपये २०८००/- इतकी रक्कम प्राप्त होत असते. सन २०२१-२२ या वित्तीय वर्षात वाहन भाडे हे सर्व जिल्हा कार्यक्रम अधिकारी यांना दिलेले असून त्यांनी प्रती प्रकल्प रुपये २०८००/- इतका निधी वितरीत केलेला आहे.

राज्यातील नवसंजीवनी कार्यक्षेत्रातील बालमृत्यू (० ते ५ वर्षे) चे प्रमाण सन २०१९-२० च्या तुलनेने कमी आहे व ते कमी कमी होत आहे.

(३) आदिवासी व दुर्गम भागात आरोग्य यंत्रणा बळकट करुन माता व बालमृत्यू कमी करण्याच्यादृष्टीने आरोग्य विभागामार्फत खालील उपाययोजना करण्यात येतात.

बाल आरोग्य संबंधी योजना :- आजारी नवजात बालकांच्या उपचारासाठी विशेष कक्ष (SNCU), नवजात शिशु स्थिरीकरण कक्ष (NBSU), ग्राम बालविकास केंद्र (VCDC), प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावरील बाल उपचार केंद्र (CTC), पोषण पुनर्वसन केंद्र (NRC), Mother Absolute Affection व राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम

माता आरोग्य संबंधी योजना :- जननी सुरक्षा योजना, जननी शिशु सुरक्षा कार्यक्रम, मानव विकास कार्यक्रम, प्रधानमंत्री मातृ वंदना योजना व प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व अभियान नवसंजिवनी योजना (मातृत्व अनुदान योजना, भरारी पथक योजना, दाई बैठका योजना)

जिल्हा स्तरावर सर्व माता मृत्यू व बालमृत्यू यांचे अन्वेषण करण्यात येते.

एकात्मिक बालविकास सेवा योजना अंतर्गत बालमृत्यूचे प्रमाण रोखण्यासाठी खालीलप्रमाणे उपाय योजना केल्या जातात.

१) एकात्मिक बालविकास सेवा योजनेंतर्गत ६ महिने व ३ वर्ष वयोगटातील बालकांना, गरोदर, स्तनदा मातांना THR व ३ ते ६ वयोगटातील बालकांना गरम ताजा आहार देण्यात येतो.

२) तसेच आदिवासी प्रकल्पामध्ये अमृत आहार योजना सुरु असून ह्या योजनेंतर्गत गरोदर स्तनदा मातांना एक वेळचा चौरस आहार देण्यात येतो.

३) तसेच अमृत आहार योजनेंतर्गत ६ महिने ते ६ वर्षे वयोगटातील बालकांना आठवड्यातुन ४ दिवस अंडी व शाकाहारी बालकांना प्रतिदिन २ केळी व मांसाहारी बालकांना १ अंडी देण्यात येतात.

४) अमृत आहार योजनेतंर्गत गरोदर, स्तनदा माता यांच्यासाठी प्रती लाभार्थी एक वेळचा चौरस आहारासाठी खर्च रुपये ३५/- व ६ महिने ते ६ वर्षे वयोगटातील बालकांना अंडी/केळी यासाठी प्रती लाभार्थी नियमित आहारा व्यतिरिक्त रुपये ६/- इतका अदा करण्यात येतो.

५) तसेच राज्यातील सॅम बालकांसाठी ग्राम बालविकास केंद्र सुरु करण्यात आली आहेत. ग्राम बालविकास केंद्रामध्ये ३ वेळ चा अतिरिक्त आहार व आरोग्य विभागामार्फत औषधोपचार करण्यात येतात.

६) राज्यात पोषण अभियान अंतर्गत अंगणवाडी केंद्रातील बालकांचा, किशोरवयीन मुले व महिलांचा पोषणाचा दर्जा सुधारण्यासाठी व कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी विविध स्तरावरुन निरंतर शिक्षण वृध्दी दृष्टीकोन समुदाय आधारीत कार्यक्रम, रिअल टाईम मॉनिटरिंग व जन आंदोलन इत्यादी उपक्रम राबविण्यात येत आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## परळी (ता.वाडा, जि.पालघर) प्राथमिक आरोग्य केंद्राचे ग्रामीण रुग्णालयात तसेच वाडा ग्रामीण रुग्णालयाचे उप जिल्हा रुग्णालयात रुपांतर करण्याबाबत

**(४९) * १३०१७ श्री.विक्रम काळे, श्री.शशिकांत शिंदे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अमोल मिटकरी :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौ.परळी (ता.वाडा, जि.पालघर) येथील आदिवासी भागातील प्राथमिक आरोग्य केंद्राचे ग्रामीण रुग्णालयात रुपांतर करण्याचा निर्णय शासनाने गत दोन वर्षापूर्वी घेतल्याचे तसेच, वाडा येथील ग्रामीण रुग्णालयाचे श्रेणीवर्धन करुन उपजिल्हा रुग्णालयात रुपांतर करण्यास माहे मार्च, २०२१ मध्ये मंजूरी दिली असल्याचे दिनांक २८ डिसेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन १९६० मध्ये त्यावेळच्या लोकसंख्येच्या निकषानुसार बांधण्यात आलेल्या ३० खाटांचे वाडा येथील रुग्णालय रुग्णांची वाढती संख्या लक्षात घेता अपुरे पडत असून तेथे दररोज ३०० ते ३५० बाहयरुग्णांची तपासणी करण्यात येत असून प्रत्येक महिन्याला ८० ते ९० प्रसुती होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपजिल्हा रुग्णालयासाठी पाच ते साडेपाच एकर जागा लागत असून सध्या अडीच एकर जागा उपलब्ध असल्यामुळे नवीन जागेत रुग्णालय बांधावे की हे तोडून नवीन रूग्णालय बांधावे याचा निर्णय झालेला नसल्याचे वैद्यकीय अधीक्षक, ग्रामीण रुग्णालय, वाडा यांचेकडून सांगण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर दोन्ही रुग्णालयांची जैसे थे स्थिती असल्याने आदिवासी गोरगरीब जनतेला आरोग्य सेवेपासून वंचित रहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने मौ.परळी येथील आदिवासी भागातील प्राथमिक आरोग्य केंद्राचे ग्रामीण रुग्णालयात व वाडा येथील ग्रामीण रुग्णालयाचे श्रेणीवर्धन करुन उपजिल्हा रुग्णालयात रुपांतर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे** :(१) हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

ग्रामीण रुग्णालय, वाडा येथे सद्दस्थितीत दररोज १७० ते १८० बाह्यरुग्ण उपचार घेतात तसेच मासिक ७० ते ७५ प्रसूती होत आहेत.

(३) हे खरे नाही.

ग्रामीण रुग्णालय, वाडा येथे १०० खाटांचे उपजिल्हा रुग्णालयाचे बांधकाम करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून अंदाजपत्रक व आराखडे प्राप्त करुन घेण्याची कार्यवाही जिल्हा शल्य चिकित्सक, पालघर यांचे स्तरावर सुरु आहे. तसेच नवीन ५ एकर शासकीय जागा मिळणेबाबत उपविभागीय अधिकारी, वाडा यांना पत्र देण्यात आलेले आहे.

(४) हे खरे नाही.

रुग्णालयात येणाऱ्या सर्व रुग्णांना उपलब्ध असलेल्या आरोग्य सुविधा पुरविण्यात येतात.

(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## रायगड जिल्ह्यातील शासकीय रूग्णालयांमध्ये अग्निशमन यंत्रणा बसविण्याबाबत

**(५०) * १२१६६ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील बहुसंख्य शासकीय रुग्णालयात शॉर्ट सर्किटमुळे आग लागण्याच्या घटना घडत असल्यामुळे रायगड जिल्ह्यातील जिल्हा रूग्णालयासह, उपजिल्हा रूग्णालय व ग्रामीण रूग्णालयांमध्ये सुरक्षेच्यादृष्टीने अग्निशमन यंत्रणा बसविण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोरोना काळात विविध ठिकाणी रूग्णालयांमध्ये आग लागण्याच्या अनेक दुर्घटना घडल्याने अनेक रूग्णांना जीव गमवावा लागला असून सदर रुग्णालयांत वीज उपकरणांची निगा व देखभाल योग्यरितीने न राखल्याने आग लागण्याच्या घटना घडल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विद्युत दोषांमुळे होणारे अपघात टाळण्यासाठी रूग्णालयातील विद्युत उपकरणांची तपासणी वा दुरूस्ती करणे तसेच रूग्णालय इमारतीचे फायर ऑडीट नियमितपणे सक्षम संस्थेमार्फत करून अग्निसुरक्षा प्रमाणित करण्यात येणे इत्यादी गोष्टींची पूर्तता रूग्णालयांकडून करणे आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने रायगड जिल्ह्यातील जिल्हा रूग्णालयासह, उप जिल्हा रूग्णालय व ग्रामीण रूग्णालयांमध्ये सुरक्षेच्यादृष्टीने अग्निशमन यंत्रणा बसविण्याबरोबरच रूग्णालयातील वीज पुरवठा योग्य रहावा व रूग्णालयात येणाऱ्या रूग्णांच्या जीवन सुरक्षेला सर्वाधिक प्राधान्य द्यावे याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे :** (१), (२) व (३) हे खरे आहे.

(४) जिल्हा रुग्णालय, रायगड व अधिपत्याखालील उपजिल्हा, ग्रामीण रुग्णालये याठिकाणी Fire Fighting, Fire Alarm, Sprinkler आणि P.S.A. System बसविण्यासाठी सन २०२१-२०२२ या आर्थिक वर्षात

सर्वसाधारण योजनेंतर्गत लेखाशीर्ष ४५१५०५९४ अंतर्गत जिल्हाधिकारी, रायगड यांच्या दिनांक ११/०७/२०२१ च्या प्रशासकीय मान्यता आदेशान्वये रुपये ६,५०,७८,०००/- इतक्या रकमेस मान्यता देण्यात आलेली आहे. सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत जिल्हा रुग्णालय, रायगड व अधिनस्त रुग्णालयांमध्ये अग्निशमन यंत्रणा बसविण्याची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात कोरोना काळात दोन्ही पालक गमावलेल्या अनाथ बालकांना आर्थिक मदत मिळणेबाबत

**(५१) * १२७४२ श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील : दिनांक २३ डिसेंबर, २०२१ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक १० मधील प्रश्न क्रमांक ९१०३ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कोरोनाच्या दोन्ही लाटेत ज्या मुलांनी दोन्ही पालक गमावले आहेत त्या अनाथ बालकांना शासनाकडून त्या मुलांच्या नावे संयुक्त खाते उघडुन रुपये ५ लाख देण्यात येणार असून संबंधित मुलाचे वय २१ वर्ष पूर्ण झाल्यानंतर त्यांना रुपये ५ लाखाच्या ठेवीवरील व्याज व मुद्‌दल देण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोरोना काळात दोन्ही पालक गमावलेल्या १३ हजार बालकांचा शोध घेवुन त्यांना महिन्याला रुपये २३७५ दरडोई मदत करण्याची घोषणा करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बालसंगोपन योजनेंतर्गत जिल्हा बालविकास यंत्रणेच्या माध्यमातून अनाथ बालकांसाठी दर महिना रुपये ११०० मदत करण्यात येते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, १३ हजार अनाथ बालकांचा बालसंगोपन निधी अजुनही संबंधित बालकांना मिळालेला नसून सदर निधी वितरीत न करण्याची कारणे काय आहेत,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चौकशीच्या अनुषंगाने अनाथ बालकांचा शोध घेऊन त्यांना बालसंगोपन निधी वितरीत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे)** : (१) होय. हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

माहे फेब्रुवारी, २०२२ पर्यंत कोविड-१९ संसर्गामुळे दोन्ही पालक गमावलेल्या बालकांची एकूण संख्या ७६९ इतकी आहे. शासन निर्णय दिनांक १७/०६/२०२१ अन्वये दोन्ही पालक गमावलेल्या बालकांना बालसंगोपन योजनेचा लाभ अनुज्ञेय करण्यात आला आहे. या बालकांना बालसंगोपन योजनेंतर्गत दर महिन्याला रुपये ११००/- इतका लाभ देण्यात येत आहे. तसेच जिल्हास्तरीय कृती दलामार्फत एक आणि दोन्ही पालक गमावलेल्या २५००७ बालकांचा शोध घेण्यात आलेला आहे. या बालकांना बालसंगोपन योजनेचा लाभ देण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) होय हे खरे आहे,

(४) बालसंगोपन योजनेसाठी सन २०२१-२२ करीता रुपये १९८०.०० लक्ष निधी अर्थसंकल्पीत करण्यात आला होता.सदर संपूर्ण निधी दिनांक १७/०६/२०२१ व दिनांक २२/१२/२०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये वितरीत करण्यात आला आहे.

कोरोनामुळे एक किंवा दोन पालक गमावलेल्या बालकांना न्याय हक्क मिळवून देण्याकरीता व त्यांचे यथायोग्य संगोपन होण्याकरीता महिला व बालविकास विभागाच्या शासन निर्णय दिनांक ०७/०५/२०२१ अन्वये प्रत्येक जिल्ह्यामध्ये जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली टास्क फोर्सची नियुक्ती करण्यात आली आहे. सदर टास्क फोर्स मार्फत आतापर्यंत एक आणि दोन्ही पालक गमावलेल्या २५००७ बालकांचा शोध घेण्यात आला असून अशा बालकांना बाल संगोपन योजनेचा लाभ देण्याबाबतचा निर्णय शासन स्तरावरुन घेण्यात आला आहे. सदर लाभार्थ्यांच्या संख्येमध्ये झालेल्या वाढीच्या अनुषंगाने रुपये ३१.८२ कोटी इतका अतिरीक्त निधी पुरवणी मागणीद्वारे उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. त्यापैकी रुपये १८.९२ कोटी

निधी दिनांक ०४/०२/२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये वितरीत करण्यात आला आहे. सबब याप्रकरणी कोणत्याही प्रकारच्या चौकशीची आवश्यकता नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## येरवडा (जि.पुणे) येथील प्रादेशिक मनोरुग्णालयातील वैदयकीय अधीक्षकांवरील कारवाईबाबत

**(५२) * १२४८६ श्री.सुरेश धस :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्रादेशिक मनोरुग्णालय येरवडा, पुणे येथील वैद्यकीय अधीक्षक यांना अॅट्रॉसिटी कायद्याअंतर्गत दिनांक १५ डिसेंबर, २०१५ ते दिनांक १९ डिसेंबर, २०१५ रोजीपर्यंत अटक करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासकीय कर्मचाऱ्याला सलग चार दिवस अटक झाल्यास शासकीय नियमानुसार करण्यात येणारी कारवाई वैदयकीय अधीक्षक यांच्यावर करण्यात आली होती काय, अटकेच्या कालावधीतील दिवसांचे अदा करण्यात आलेले वेतन वसूल करण्यात आले आहे काय, शासकीय नियमानुसार कारवाई करण्याबाबत शासनस्तरावरुन आदेश दिलेले असतानाही वैद्यकीय अधीक्षकांवर कारवाई न करण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) असल्यास, आरोग्य सेवा, पुणे यांच्याकडून संबंधित वैद्यकीय अधीक्षक व वैद्यकीय उपअधीक्षक यांच्याविरुध्द शिस्तभंगविषयक कारवाईचा प्रस्ताव आरोग्य सेवा आयुक्तालयास प्राप्त झाला आहे काय, प्राप्त प्रस्तावानुसार आयुक्तांकडून कोणती कारवाई करण्यात आली आहे, सदर प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला आहे काय, प्रस्ताव शासनास पाठविण्यात आला नसल्यास त्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चौकशीच्या अनुषंगाने वैदयकीय अधीक्षकावर आणि त्यांनी केलेल्या गैरव्यवहार व त्यांच्या विरुध्द प्राप्त होणाऱ्या इतर तक्रारींची चौकशी न करणाऱ्या डॉ.संजय देशमुख तसेच

इतर संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली तसेच त्यांची मेळघाट येथे बालरोगतज्ञ म्हणून बदली करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) अटकेच्या कालावधीतील वेतन वसुल करण्याबाबत उपसंचालक, पुणे यांनी त्यांच्या दिनांक २९/१२/२०२१ च्या पत्रान्वये अधीक्षक, प्रादेशिक मनोरुग्णालय, येरवडा, पुणे यांना कळविले आहे. तसेच शासन पत्र दिनांक ३०/१२/२०२१ अन्वये सर्व संबंधिताविरुध्दचा विभागीय चौकशीचा प्रस्ताव मागविला आहे.
(३) व (४) उपसंचालक, आरोग्य सेवा, पुणे मंडळ, पुणे यांनी त्यांच्या दिनांक १५/०२/२०२२ च्या पत्रान्वये शिस्तभंगविषयक कारवाई करण्याचा विभागीय चौकशीचा प्रस्ताव संचालक, आरोग्य सेवा आयुक्तालयाकडे सादर केला आहे. तथापि, सदर प्रस्ताव अद्याप शासनास प्राप्त झालेला नाही. तर डॉ.अभिजीत फडणीस, अधीक्षक, प्रादेशिक मनोरुग्णालय, येरवडा, पुणे यांची वैद्यकीय अधीक्षक, उपजिल्हा रुग्णालय, बारामती, जि.पुणे या पदावर दिनांक २१/०१/२०२२ च्या आदेशान्वये बदली करण्यात आलेली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## परभणी जिल्हयातील टाकळी (कु.) ते शहापूर दरम्यानच्या रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत

**(५३) * १२०९५ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) टाकळी (कु.) ते शहापूर (ता.जि.परभणी) दरम्यानच्या गावांना जोडणाऱ्या रस्त्याचे काम सहा महिन्यापूर्वी मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत तयार करण्यात आले असून निकृष्ट दर्जाच्या कामामुळे त्या रस्त्याची दुरवस्था झाली असून संबंधित कंत्राटदार व सनियंत्रण अधिकारी यांच्याविरुध्द कारवाई करण्याबाबतची तक्रार सामाजिक कार्यकर्त्यांनी ई-मेलद्वारे प्रधान सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्याकडे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याच्या कामाची व त्याच्या दर्जाबाबत राज्यस्तरीय दक्षता पथकाकडून चौकशी करण्यात आली आहे काय, त्यात काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने सदर रस्त्याचे निकृष्ट पध्दतीने काम करणाऱ्या कंत्राटदार व सनियंत्रण अधिकाऱ्याविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ :** (१) तक्रार प्राप्त झाली, हे खरे आहे.

(२) व (३) प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने सदर रस्त्याच्या कामाची वरिष्ठ राज्य गुणवत्ता निरीक्षक यांचेमार्फत पुन:श्च तपासणी आदेशित करण्यात आली आहे.

-----------------

## सार्वजनिक आरोग्य विभागाच्या गट "क" व गट "ड" च्या पद भरतीकरीता आयोजित केलेल्या परीक्षांच्या पेपर फुटीबाबत

**(७४) * १२४३५ श्री.रविंद्र फाटक, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, डॉ.परिणय फुके, श्री.सुरेश धस, डॉ.रणजित पाटील, श्री.सदाशिव खोत, श्री.प्रसाद लाड, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.निलय नाईक, श्री.प्रवीण दटके, श्री.रमेशदादा पाटील, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात आरोग्य विभागाच्या गट "क" व "ड" च्या दिनांक २४ व ३१ ऑक्टोबर, २०२१ रोजी झालेल्या दोन्ही परीक्षांचे पेपर फुटल्याचे पोलीस विभागाने केलेल्या तपासणीत निदर्शनास आले असून सदर प्रश्नपत्रिका मुंबई आरोग्य संचालनालयातील सहसंचालक यांनी लातूरमधील मुख्य प्रशासकीय अधिकारी यांना पाठविल्याचे पोलीस तपासात निष्पन्न झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आरोग्य विभागाच्या सहसंचालक व इतर अधिकाऱ्यांसह परिक्षेची जबाबदारी असलेल्या न्यासा कम्युनिकेशन या कंपनीकडून राबविण्यात आलेल्या परीक्षा आयोजनात गैर मार्गाचा अवलंब केल्याने कंपनी मालकापासून ते आरोग्य विभागाचे अधिकारी व इतरांवर गुन्हे दाखल करण्यात आले असून सायबर पोलीस विभाग, पुणे यांनी आतापर्यंत २८ आरोपींना अटक केली असून या प्रकरणात प्रशासनातील आणखी किती अधिकारी/कर्मचारी यांचा समावेश आहे, त्यांचेकडून प्रश्नपत्रिका फूट प्रकरणी किती रुपयांचा मुद्देमाल पकडण्यात आला आहे,

(३) असल्यास, आरोग्य विभागाच्या गट “क” व “ड” पदासाठीच्या स्थगित कराव्या लागणाऱ्या परीक्षा प्रकरणाची व सेवा पुरवठादार कंपन्यांचे पॅनल तयार करण्यासाठी राबविलेल्या निविदा प्रक्रियेची सीआयडी, सीबीआय किंवा निवृत्त न्यायाधीशांमार्फत चौकशी करावी अशी मागणी विधान परिषदेचे विरोधी पक्ष नेते यांनी त्यांच्या दिनांक २९ सप्टेंबर, २०२१ रोजीच्या पत्रान्वये शासनास केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यात विविध विभागांच्या परिक्षांमध्ये पेपर फुटीची प्रकरणे वारंवार होत असल्याने अनेक परिक्षार्थींचे भवितव्य धोक्यात येत असून परीक्षा पध्दतीवर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चौकशीच्या अनुषंगाने आरोग्य विभागाच्या प्रश्नपत्रिका फोडणाऱ्या संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत तसेच, झालेल्या दोन्ही परीक्षा रद्द करुन यापुढील होणाऱ्या परिक्षेत खबरदारी घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे :** (१) (१) होय, हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

सायबर पोलीस स्टेशन, पुणे यांनी दिलेल्या माहितीनुसार गट ड पदाच्या प्रश्नपत्रिका फुटीप्रकरणी सायबर पोलीस स्टेशन पुणे शहर, पुणे येथे दाखल गुन्हा रजिस्टर नं.५३/२०२१ मध्ये आरोग्य विभागात काम करणारे ०५ आरोपी, जिल्हा परिषद, बीड येथे शिक्षक म्हणून नोकरीस असलेला ०१

आरोपी व नौदल येथे खलाशी म्हणून नोकरीला असलेला ०१ कर्मचारी यांचा समावेश आहे. अटक केलेल्या आरोपींकडून अद्यापपावेतो एकूण २४ मोबाईल संच, ०४ डेबीट कार्ड, ०१ पॅनकार्ड, ०१ डीव्हीआर, ०५ हार्डडिस्क, १२ पेन ड्राईव्ह, ०१ लॅपटॉप, ०१ चारचाकी, रुपये ३३,८८०/- रोख असा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

तसेच गट क पदाच्या प्रश्नपत्रिका फुटीप्रकरणी सायबर पोलीस स्टेशन, पुणे शहर, पुणे येथे दाखल गुन्हा रजिस्टर नं.६०/२०२१ मध्ये अद्यापपावेतो ०५ आरोपी अटक आहेत. त्यामध्ये खासगी व्यक्ती ०४ व जिल्हा परिषद, बीड येथे शिक्षक म्हणून नोकरीस असलेला ०१ आरोपी यांचा समावेश आहे. अटक केलेल्या आरोपींकडून व साक्षीदारांकडून अद्यापपावेतो एकूण १० मोबाईल, ३ पेन ड्राईव्ह, रुपये ८,८९०/- रूपये रोख, १ हार्ड डिस्क, ०१ नोंदवही असा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. अद्याप तपास सुरू आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) होय, हे खरे आहे.

(५) सायबर पोलीस ठाणे, पुणे शहर, पुणे यांचेकडून संबंधीतांना अटक करून पुढील पोलीस तपास सुरू आहे.

सदर दाखल गुन्हयात १) श्री.महेश सत्यवान बोटले, प्रभारी सहसंचालक, आरोग्य सेवा (अतांत्रिक), मुंबई २) श्री.प्रशांत व्यंकटराव बडगिरे, मुख्य प्रशासकीय अधिकारी, लातूर मंडळ, लातूर ३) डॉ. संदीप त्रिंबकराव जोगदंड, वैद्यकीय अधिकारी, मनोरुग्णालय आंबेजोगाई, बीड ४) श्री.राजेंद्र पांडूरंग सानप, सहा. अधीक्षक, ग्रामीण रुग्णलय, भूम, जि.उस्मानाबाद ५) श्री.शाम महादू मस्के, चतुर्थश्रेणी कर्मचारी, स्त्री रुग्णालय, नेकनूर, बीड यांना अटक करण्यात आलेली आहे. सायबर पोलीस स्टेशन पुणे शहर, पुणे यांचेकडून पुढील तपास सुरू आहे. विभागाने संबंधित अधिकारी व कर्मचारी यांचेवर निलंबनाची कारवाई केली आहे. तसेच आरोपींवर गुन्हा दाखल करण्यास विभागाने परवानगी दिलेली आहे.

(६) कार्यवाही सुरू आहे.

----------------

## सावनेर (जि.नागपूर) येथील कोच्छी बॅरेज प्रकल्पाचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत

**(५५) * १२३५९ श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावनेर (जि.नागपूर) येथे महत्वपूर्ण कोच्छी बॅरेज प्रकल्पाचे बांधकाम सुरू असून सदर बांधकाम हे निकृष्ट दर्जाचे झाले असल्याने त्याबाबत जलसंपदा विभागात कंत्राटदाराविरुध्द तक्रारी दाखल केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोच्छी प्रकल्पाचे बांधकाम १० वर्षापासून सुरू असून अद्याप पूर्ण न झाल्यामुळे जिल्ह्यातील व जिल्ह्याबाहेरील क्षेत्रात पेयजल तथा सिंचनाची समस्या निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर कोच्छी प्रकल्पाच्या निकृष्ट बांधकामाची गुणवत्ता तपासून कंत्राटदाराविरुध्द दंडात्मक कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयंत पाटील :** (१) नाही.

सदर बांधकाम निकृष्ट दर्जाचे झालेले नाही. सदर काम करत असताना वेळोवेळी जलसंपदा विभागाच्या अधिकारी व गुणनियंत्रण यंत्रणेचे अधिकारी यांनी बॅरेजला भेटी दिलेल्या आहेत व कामाची गुणवत्ता व पत यांचे सनियंत्रण करण्यात आले आहे.

(२) हे खरे नाही.

(३) नाही.

गुणनियंत्रण यंत्रणेचे अधिकारी यांच्या अहवालानुसार सदर कामाची गुणवता चांगल्या दर्जाची असल्याने ठेकेदारांवर कठोर कारवाई व दंडात्मक कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## घाटकोपर (पश्चिम), मुंबई येथील नारायणनगर परिसरातील औद्योगिक कंपनीतील मृत कामगारांच्या नातेवाईकांना आर्थिक मदत देण्याबाबत

**(५६) * १२०२९ श्री.महादेव जानकर, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घाटकोपर (पश्चिम), मुंबई येथील नारायणनगर परिसरातील औद्योगिक कंपनीमध्ये इथेनॉल टाकीची साफसफाई करण्यासाठी उतरलेल्या तीन कामगारांना अस्वस्थ वाटू लागल्याने त्यांना राजावाडी रुग्णालयात दाखल करण्यात आले असता त्यापैकी एका कामगाराचा मृत्यू झाल्याची घटना माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान घडली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने मृत कामगाराच्या नातेवाईकांना व जखमींना आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ :**(१) मे.एस.के. डायस्टफ्स ॲण्ड ऑरगॅनिक केमिकल्स प्रा.लि., ६ कुर्ला इंडस्ट्रीयल इस्टेट, एनएसएस रोड, नारायण नगर, घाटकोपर (प), मुंबई या कारखान्यात दिनांक १०/०१/२०२२ रोजी रिॲक्टरमध्ये स्वच्छतेचे काम चालू असताना,रिॲक्टरमधील रसायनांच्या शिल्लक वाफांमुळे एका कामगाराचा गुदमरून मृत्यू झाला. सदर कामगारास वाचविण्यास गेलेल्या अन्य दोन कामगारांना श्वसनाचा त्रास झाल्याने त्यांना रूग्णालयात दाखल करण्यात आले होते. वैद्यकीय उपचारानंतर त्यांना घरी सोडण्यात आले आहे.

(२) सदर प्रकरणाची उप संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय, मुंबई यांचेकडून चौकशी करण्यात आली आहे.

चौकशीदरम्यान कारखान्यातील रिॲक्टरमध्ये प्रवेश करण्याआधी, रिॲक्टरमध्ये आरोग्यास धोकादायक असलेले रसायन शिल्लक नसल्याची खात्री तज्ञ व्यक्तींकडून लेखी स्वरूपात प्राप्त करून घेण्यात आलेली नव्हती असे निदर्शनास आले आहे. तसेच रिॲक्टरमध्ये प्रवेश करण्याकरीता सेल्फ

ब्रिदिंग ॲप्रेटस न वापरल्याचे व रिॲक्टरमध्ये प्रवेश करण्याऱ्या कामगारास दोरी बांधून त्याचे एक टोक रिॲक्टरच्या बाहेर उभ्या असलेल्या कामगारास दिले गेले नसल्याचे आढळून आले आहे.

सदर कारखान्यातील मृत कामगाराच्या वारसास नुकसान भरपाई देण्यासाठी कारखाना व्यवस्थापनाकडून रुपये ११,८३,०२४/- इतक्या रकमेचा धनादेश आयुक्त, नुकसान भरपाई, मुंबई यांचे न्यायालयात जमा करण्यात आली असून मृत कामगाराच्या पत्नीस रुपये १२,५०,०००/- इतकी रक्कम सानुग्रह अनुदान म्हणून देण्यात आलेली आहे.

तसेच, दुर्घटनेत जखमी झालेल्या दोन कामगारांचा वैद्यकीय उपचाराचा खर्च कारखाना व्यवस्थापनाने केला असून वैद्यकीय उपचारानंतर दोन्ही कामगार दिनांक ११/०१/२०२२ रोजी कारखान्यात कामावर रूजू झाले आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## एकात्मिक जलनियोजन प्रकल्पाच्या प्रस्तावानुसार वैतरणा ते उंडोळ खोऱ्यात पाणी वळविणेबाबत

**(५७) * १२००१ श्री.अंबादास दानवे : तारांकित प्रश्न क्रमांक १०६१४ ला दिनांक २३ डिसेंबर, २०२१ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अधीक्षक अभियंता, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद यांच्या पत्र क्रमांक १०६७, दिनांक ९ फेब्रुवारी, २०२१ रोजीच्या पत्रानुसार एकात्मिक जलनियोजन प्रकल्पाचा (Integrated approach) प्रस्ताव मुख्य अभियंता, नदीजोड प्रकल्प समन्वय कक्ष, नाशिक यांचेकडे प्राप्त झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकल्पात नमूद केलेल्या समुद्र सपाटी अर्थात तलांक ५६५ मी. ते ५६० मी. चे पाणी प्रवाही पध्दतीने बोगद्यातून वैतरणा ते उंडोळ खोऱ्यात वळविणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, एकात्मिक जलनियोजन प्रकल्प हा जर व्यवहार्य ठरणार असेल तर इतर छोटे ३० प्रकल्प यांची उपयुक्ततेबद्दल शासनाने तज्ञांची मते व अहवाल विचारात घेतला आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयंत पाटील :** (१) होय.

तथापि, शासन निर्णय दिनांक १०/१२/२०२० अन्वये नदीजोड प्रकल्प समन्वय कक्षाची कार्यकक्षा ठरवून दिलेली आहे. गोदावरी पाटबंधारे विकास महामंडळाच्या दिनांक ०९/०२/२०२१ च्या पत्रान्वये मुख्य अभियंता (नदीजोड प्रकल्प समन्वय), नाशिक यांना पाठविण्यात आलेल्या प्रस्तावाबाबत उपरोक्त कार्यकक्षेप्रमाणे कार्यवाही होणे अपेक्षित नसल्याचे मुख्य अभियंता (नदीजोड प्रकल्प समन्वय), नाशिक यांनी त्यांच्या दिनांक ०५/०३/२०२१ च्या पत्रान्वये महामंडळास कळविलेले आहे.

(२) कोणत्याही प्रस्तावित प्रकल्पास प्रथम मुख्य अभियंता, जलविज्ञान व धरण सुरक्षितता, नाशिक यांचेकडून पाणी उपलब्धता प्रमाणपत्र प्राप्त करणे आवश्यक आहे. सदर पाणी उपलब्धता प्राप्त झाल्यानंतर प्रस्तावित प्रकल्पासाठी क्षेत्रिय स्तरावर प्राथमिक अभ्यास करून त्यास सक्षम स्तरावर मान्यता घेऊन जर प्रकल्प तांत्रिक व आर्थिकदृष्टया व्यवहार्य असेल तर त्याचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे, तद्नंतर सदर सविस्तर प्रकल्प अहवालास राज्य तांत्रिक सल्लागार समिती यांची मान्यता घेणे, महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम २००५ कलम ११ (च) अंतर्गत महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाची मान्यता प्राप्त करणे या सर्व बाबींची क्षेत्रिय/ महामंडळ स्तरावर पूर्तता झाल्यानंतर प्रस्ताव शासनास प्रशासकीय मान्यता प्रदान करणेसाठी प्राप्त होतो. तदनंतर राज्याच्या आर्थोपायाची स्थिती व मा.राज्यपाल महोदयांचे निदेश यानुसार शासन स्तरावर प्रशासकीय मान्यता देण्यात येते.

त्यामुळे उपरोक्त बाबींची क्षेत्रिय / महामंडळ स्तरावरून पूर्तता होऊन प्रशासकीय मान्यतेसाठी कोणताही प्रस्ताव शासनास प्राप्त झाला नसल्याने वैतरणा ते उंडोळ खोऱ्यात पाणी वळविणेबाबत शासनाने कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(३) उपरोक्त प्रमाणे गोदावरी पाटबंधारे विकास महामंडळाकडून शासनास कोणताही प्रस्ताव प्राप्त झाला नसल्याने प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील शासकीय रुग्णालयातील फॉर्मासिस्ट (औषधनिर्माता) यांच्या पदोन्नतीबाबत

**(५८) * ११७९५ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.नागोराव गाणार, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील आरोग्य शिक्षण व संशोधन संचालनालयाशी संलग्न १८ शासकीय रुग्णालयातील फार्मासिस्ट यांना सेवाज्येष्ठतेनूसार पदोन्नती नाकारण्यात येत असल्याची बाब माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गत १५ वर्षांपासून सेवाज्येष्ठतेनूसार तिसऱ्या श्रेणीतून दुसऱ्या श्रेणीत नियुक्ती केली जावी ही मागणी नाकारली जात असल्याने फार्मासिस्ट निषेध मोर्चे काढत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत उमेदवारांची नियुक्ती करण्याऐवजी शासकीय रुग्णालयातील दुसऱ्या श्रेणीतील फार्मासिस्टसाठी आवश्यक पात्रता व अनुभव असलेल्या तिसऱ्या श्रेणीतील फार्मासिस्टची नियुक्ती न करण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने आरोग्य शिक्षण व संशोधन संचालनालयाशी संलग्न १८ शासकीय रुग्णालयातील तिसऱ्या श्रेणीतील फार्मासिस्टना दुसऱ्या श्रेणीत पदोन्नती देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अमित विलासराव देशमुख :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.

(३) सेवाप्रवेश नियमानुसार औषधनिर्माता गट-ब हे पद पदोन्नतीने भरण्याची तरतूद नाही.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नंदुरबार जिल्ह्यातील डॉ.अब्दुल कलाम अमृत आहार योजनेत गैरव्यवहार झाल्याबाबत

**(५९) * ११७७० श्री.सदाशिव खोत, श्री.गोपिचंद पडळकर :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नंदुरबार जिल्ह्यात डॉ.अब्दुल कलाम अमृत आहार योजनेत मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाल्याचे माहे डिसेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अमृत आहार योजनेद्वारे आदिवासी भागातील गरोदर महिला, स्तनदा माता व तीन वर्षापर्यंतची बालके यांना पोषण आहार वेळेवर मिळण्यासाठी तीन पर्याय सूचविण्यात आले असताना हे तीनही पर्याय न वापरता कुपोषणासाठी संवेदनशील असलेल्या नंदुरबार जिल्ह्यात पुण्यातील एकाच ठेकेदाराला पोषण आहार पुरवठा करण्यासाठी नेमण्यात आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर योजनेत रुपये १३ कोटीचा धान्य पुरवठा करण्यात आल्याचे निदर्शनास आले असून अमृत आहार योजनेमध्ये मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाला असून त्याची चौकशी करुन दोषींवर कारवाई करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी, संघटना व सामाजिक कार्यकर्ते यांनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरहू मागणीच्या अनुषंगाने अमृत आहार योजनेत झालेल्या गैरव्यवहाराची चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित दोषींवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) :** (१) हे खरे नाही.

भारतरत्न डॉ.ए.पी.जे.अद्बुल कलाम अमृत आहार योजनेंतर्गत आहार पुरवठ्याच्या अनियमिततेबाबत दै.दिव्य मराठी या दैनिकात बातमी प्रसिध्द झाली होती. सदर बातमीच्या अनुषंगाने आयुक्त, आदिवासी विकास विभाग यांचे अध्यक्षतेखाली त्रिस्तरीय समिती आदिवासी विकास विभागाने गठीत केली होती. सदर समितीच्या चौकशी अहवालानुसार सदर प्रकरणात अनियमितता झालेली नसल्याचे दिसून येते.

(२) हे खरे नाही.

शासनाने ठरवून दिलेल्या तीन पर्यायांपैकी पर्याय क्र.०२ गरम ताजा आहार ऐवजी अन्न घटक एकत्रित पॅकेट करुन लाभार्थ्यांना आहार पुरवठा केलेला आहे. आहार पुरवठ्यासाठी राज्यस्तरावरुन अथवा जिल्हास्तरावरुन कोणतेही पुरवठा आदेश देण्यात आलेले नाही. पुरवठा आदेश संबंधित अंगणवाडी सेविकांमार्फत “महावीर ट्रेडर्स” पुणे यांच्या स्थानिक शाखेस देण्यात आल्याचे दिसून येते. चौकशी अहवालानुसार सदर बाबतीत समितीस अनियमितता झालेली दिसून आलेली नाही.

(३) व (४) सदर प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधी संघटना व सामाजिक कार्यकर्ते यांनी चौकशीची मागणी केली होती. त्यानूसार आयुक्त, आदिवासी विकास विभाग यांचे अध्यक्षतेखालील चौकशी समितीने दिलेल्या अहवालानुसार गैरव्यवहार झालेला नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही

-----------------

## राज्याच्या वित्त विभागामार्फत करण्यात आलेल्या खर्चाच्या माहितीबाबत

**(६०) * १२७३९ श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, डॉ.परिणय फुके, श्री.सुरेश धस, डॉ.रणजित पाटील, श्री.सदाशिव खोत, श्री.प्रसाद लाड, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.निलय नाईक, श्री.प्रवीण दटके, श्री.रमेशदादा पाटील, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मा.विरोधी पक्ष नेता, विधान परिषद यांनी अप्पर मुख्य सचिव (वित्त) यांना दिनांक २९ डिसेंबर, २०२१ रोजी वित्त विभागामार्फत करण्यात आलेल्या खर्चाबाबत पत्र दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने पत्राच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अजित पवार :** (१) व (२) मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद यांनी अपर मुख्य सचिव (वित्त) यांना दिनांक २९ डिसेंबर, २०२१ रोजी पाठविलेल्या पत्रास अनुसरून, अर्ध शासकीय पत्र क्रमांक संकीर्ण-२०२२/प्र.क्र.०८/अर्थ-३, दिनांक ०२/०२/२०२२ अन्वये मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद यांना उत्तर पाठविण्यात आलेले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अर्जुनी मोरगाव (जि.गोंदिया) तालुक्यातील रब्बी हंगामाच्या धान पिकासाठी इटियाडोह धरणाचे पाणी देण्याबाबत

**(६१) * १२९८२ श्री.नागोराव गाणार, श्री.प्रविण दरेकर, अ‍ॅड.निरंजन डावखरे, श्री.रामदास आंबटकर, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात अर्जुनी मोरगाव (जि.गोंदिया) तालुक्यातील रब्बी हंगामाच्या धान पिकासाठी इटियाडोह धरणाचे पाणी देण्यात यावे या मागणीसाठी धरण परिसरातील धान उत्पादक शेतकरी धरणाच्या गेटसमोर साखळी उपोषणाला बसले असल्याची बाब माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अर्जुनी मोरगाव तालुक्यात गोठणगाव येथे धरण बांधतेवेळी ज्या शेतकऱ्यांची हजारो हेक्टर शेती धरणामध्ये गेली व त्यांचे पुनर्वसन करण्यात आले ते शेतकरीसुद्धा सिंचनापासून वंचित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चौकशीच्या अनुषंगाने धरण परिसरातील शेतकऱ्यांना रब्बी हंगामाच्या धान पिकासाठी इटियाडोह धरणातून पाणी देण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयंत पाटील :** (१) होय.

गोठणगांव शाखा कार्यालयाचे अधिनस्त पाणी वापर संस्थेचे लाभधारक श्री रतिराम कारुराणे व इतर हे इटियाडोह धरणाचे मुख्य गेट समोर दिनांक ३१/१२/२०२१ ते ०४/०१/२०२२ पर्यंत साखळी उपोषणास आणि दिनांक ०५/०१/२०२२ ते ०७/०१/२०२२ पर्यंत आमरण उपोषणाकरीता बसलेले होते.

(२) नाही.

उन्हाळी हंगाम २०२१-२२ च्या सिंचनाकरीता दिनांक ३१/१०/२०२१ रोजी प्रकल्प स्तरीय पाणीवापर संस्था यांचे समवेत झालेल्या सभेतील ठरावानुसार व इटियाडोह धरणातील उपलब्ध पाणी साठ्यानुसार १०० टक्के वसुलीचे निकष ठेवून व मर्यादित जलसाठा असलेल्या सन २०१८-१९ मध्ये उन्हाळी हंगामातील सिंचन क्षेत्र वगळून त्यापुढील क्षेत्राला उन्हाळी हंगाम २०२१-२२ च्या सिंचनाकरीता ६४०० हेक्टर क्षेत्राला पाणीपुरवठा करण्याचे नियोजन होते.

परंतु अर्जुनी मोरगाव तालुक्यातील शाखा गोठणगाव अंतर्गत लाभधारकांची (धरण परिसरातील शेतकरी) सिंचनासाठी पाणी मागणीची तीव्रता लक्षात घेता दिनांक ३१/१०/२०२१ चे सभेतील ठरावात ठरविण्यात आलेल्या ६४०० हेक्टर नियोजन क्षेत्रात वाढ न करता नियोजित क्षेत्रातील थकीत पाणीवापर संस्थांचे क्षेत्र वगळून व १०० टक्के वसुलीचे निकष कायम ठेवून शाखा गोठणगाव अंतर्गत ३५० ते ४०० हेक्टर क्षेत्राला पाणीपुरवठा करण्याचे नियोजन करण्यात आले. त्यानुषंगाने नियोजित ४०० हेक्टर क्षेत्राला सिंचन करण्याचे मान्य झाल्याने उपोषणकर्त्यांनी उपोषण मागे घेतले. त्यामुळे धरण परिसरातील शेतकरी सिंचनापासून वंचित राहिलेले नाहीत.

सदर नियोजित क्षेत्रातील नवनितपुर व बुटाई या पुनर्वसित गांवाच्या सिंचन क्षेत्राचासुध्दा उन्हाळी हंगाम सन २०२१-२२ मध्ये समावेश करण्यात आलेला आहे. त्यामुळे धरणामध्ये शेती गेली व त्यांचे पुर्नवसन करण्यात आले, असे शेतकरी सिंचनापासून वंचित राहिलेले नाहीत.

(३) अधीक्षक अभियंता, भंडारा सिंचन मंडळ भंडारा व प्रकल्पाचे कार्यकारी अभियंता, यांनी उपोषण ठिकाणी भेट देवून उपोषणकर्त्यांना उपोषण मागे घेण्याबाबत त्यांना परावृत्त करण्याचे प्रयत्न करण्यात आले.

तथापि, धरण परिसरातील उपोषणकर्ते शेतकऱ्यांच्या मागणीची तीव्रता लक्षात घेता नियोजित क्षेत्रातील थकीत पाणीवापर संस्थांचे क्षेत्र वगळून इतर क्षेत्राला पाणीपुरवठा करणे शक्य असल्याने ४०० हेक्टर सिंचन क्षेत्राला पाणीपुरवठा करण्याचे आश्वासन दिलेने उपोषणकर्ते यांनी उपोषण मागे घेतले. दिनांक १६/०१/२०२२ पासून मुख्य कालव्यातून पाणी सोडण्यात आले आहे. सद्य:स्थितीत सिंचन सुरळीत सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## तारासावंगा (ता.आष्टी, जि.वर्धा) गावाजवळील बंधाऱ्याच्या बॅकवॉटरमूळे शेतकऱ्यांचे नुकसान होत असल्याबाबत

**(६२) * १३००९ श्री.रामदास आंबटकर :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तारासावंगा (ता.आष्टी, जि.वर्धा) गावाजवळील पाटबंधारे विभागाने नाल्यावर बंधारा बांधल्याने त्यातील बॅकवॉटरमूळे शेतकऱ्यांच्या शेतात पाणी शिरत असून परिसरातील शेतकऱ्यांचे नुकसान होत असल्याचे दिनांक १० जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी संबंधित शेतकऱ्यांनी पाटबंधारे विभागाकडे तक्रार दाखल करून कोणतीही कार्यवाही झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने बॅकवॉटरसाठी पर्यायी व्यवस्था करण्याबाबत व तारासावंगा गावातील शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शंकरराव गडाख :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) हे खरे नाही.
या विभागाकडे अशी तक्रार प्राप्त झालेली नाही.
(३) सदर बंधाऱ्याची दिनांक २७/०२/२०२२ रोजी पाहणी करण्यात आली असून त्यानुसार बंधाऱ्यात गाळ जमा होत असल्यामुळे संभाव्य नुकसान टाळण्यासाठी बंधाऱ्यास २ मी * ०.५ मी. आकाराचे Opening करण्यात आले आहे. सदर नाला ज्या नदीला मिळतो त्या नदीवर को.प. बंधाऱ्यामध्ये फळ्या टाकल्यानंतर त्याचे बॅकवॉटर सिमेंट बंधाऱ्याच्या मागे येत असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यानुषंगाने बॅकवॉटरसाठी पर्यायी व्यवस्था करण्याचे तसेच बंधाऱ्याच्या जवळ ३० मी. भागाचे खोलीकरण करण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील लोककलावंतांना आर्थिक मदत मिळणेबाबत

**(६३) * १२५०९ ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, डॉ.रणजित पाटील, श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस : तारांकित प्रश्न क्रमांक १०५०३ ला दिनांक २३ डिसेंबर, २०२१ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोरोना काळामध्ये सांस्कृतिक कार्यक्रमांवर आलेल्या बंदीमुळे लोककलाकार आर्थिक अडचणीत सापडले असल्यामुळे त्यांच्यासाठी शासनाने कोरोना संदर्भातील जनजागृती आणि कलावंतांना एकरकमी अर्थसहाय्य या योजना जाहीर केल्या, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तिसऱ्या लाटेच्या पार्श्वभूमीवर ही आर्थिक मदत प्रलंबित राहण्याची भिती लोककलाकारांनी व्यक्त केली असून याद्या देऊनही मदत न मिळाल्याच्या तक्रारीनंतर सांस्कृतिक कार्य विभागाने जिल्हाधिकाऱ्यांकडून याद्या आल्या नसल्याने ही मदत प्रलंबित राहिल्याचे स्पष्ट केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू लोककलावंतांच्या याद्या अद्यापही सादर न करण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चौकशीच्या अनुषंगाने सदर लोककलावंतांच्या याद्या सादर करून त्यांना आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अमित विलासराव देशमुख :** (१) होय, हे खरे आहे.

अ) राज्यातील कोविड-१९ चा वाढता संसर्ग रोखण्यासाठी घ्यावयाची खबरदारी व त्याअनुषंगाने करण्यात येणारे लसीकरण याबाबत प्रत्येक जिल्ह्यात प्रयोगात्मक कलेच्या क्षेत्रातील कलावंताद्वारे जाणीव जागृती करणे यासाठी एकूण रुपये ३.०० कोटी इतक्या निधीस दिनांक ८ ऑक्टोबर, २०२१ च्या शासन निर्णयान्वये मान्यता दिली आहे.

ब) कोरोनाच्या पार्श्वभूमीवर प्रयोगात्मक कलेच्या प्रकारातील कलाकार, कलासमुह यांना एकरकमी अर्थसहाय्य देण्याबाबतचा शासन निर्णय दिनांक ३ नोव्हेंबर, २०२१ रोजी निर्गमित करण्यात आला आहे. त्यानुसार राज्यातील ५६००० कलाकारांना प्रत्येकी एकरकमी रुपये ५,०००/- प्रमाणे रुपये २८.०० कोटी व ८४७ लोककला पथकांना रुपये ६.०० कोटी व त्यांच्या निवड प्रक्रियेसंदर्भातील प्रशासकीय खर्च यासाठी रुपये १.०० कोटी असे एकूण रुपये ३५.०० कोटी एकरकमी अर्थसहाय्य करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

(२), (३) व ४) शासन निर्णय दिनांक ३ नोव्हेंबर, २०२१ अन्वये घेण्यात आलेल्या निर्णयानुसार, संबंधित जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली निवड समिती गठीत करावयाची असून ३२ जिल्हयांनी कोविड एकल अर्थसहाय्य

योजनेचा लाभ कलाकारांना देण्यासाठी जाहिरात प्रकाशित करुन कलाकारांचे अर्ज मागविले आहेत. तदनुषंगाने पात्र कलाकार निवडीची कार्यवाही सुरु आहे. तसेच समुह लोककलापथकाचे, मालक, निर्माते यांना एकरकमी कोविड विशेष अनुदान पॅकेज अंतर्गत लाभ मिळण्यासाठी संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई यांच्याकडे प्राप्त अर्जांची छाननी प्रक्रिया पूर्ण झाली असून पुढील कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मिरज (जि.सांगली) येथील शासकीय रुग्णालयास सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(६४) * ११८९९ श्री.गोपिचंद पडळकर, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मिरज (जि.सांगली) तालुक्यातील सिव्हिल रुग्णालयात दिवसेंदिवस रुग्ण वाढत असून रुग्णालयातील अपुरी जागा, अपुऱ्या सोई-सुविधा व डॉक्टर यांच्या रिक्त पदांमुळे रुग्णांचे हाल होत असल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चौकशीच्या अनुषंगाने मिरज तालुक्यातील सिव्हिल रुग्णालयातील रुग्णांचे होणारे हाल थांबविण्याबाबत व रुग्णांना योग्यरित्या उपचार मिळण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अमित विलासराव देशमुख :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालय तसेच सुपर स्पेशालिटी हॉस्पीटल येथील अद्ययावत यंत्र सामग्री खरेदीच्या निधी वापराबाबत

**(६५) * १३०६८ श्री.अभिजित वंजारी, श्री.रामदास आंबटकर :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालय (मेडिकल) व सुपर स्पेशालिटी हॉस्पीटल येथील अद्ययावत यंत्र सामग्री खरेदीकरीता निधी प्राप्त होवूनही रूग्णालयाव्दारे खरेदी प्रक्रिया न राबविल्याने हाफकिनला रुपये ३२ कोटी निधी परत करण्यात आल्याचे दिनांक २१ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर महाविद्यालय व रुग्णालयामध्ये उपचारासाठी असलेल्या काही मशिन्स बंद तर काही वापराविना पडून असल्याने रुग्णालयात उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चौकशीच्या अनुषंगाने नागपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालय (मेडिकल) व सुपर स्पेशालिटी हॉस्पीटल अद्ययावत यंत्र सामग्री खरेदीकरीता प्राप्त निधीचा योग्य वापर न करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करुन बंद असलेल्या तसेच वापराविना पडून असलेल्या मशिनचा वापर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अमित विलासराव देशमुख :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात आरोग्य यंत्रणा व शासकीय यंत्रणा कोरोना रुग्णांवर उपचार करण्यासाठी केंद्रित झाल्या असल्याने अन्य आजारांच्या रुग्णांवर परिणाम होत असल्याबाबत

**(६६) * १२३४७ डॉ.रणजित पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात आरोग्य यंत्रणा व शासकीय यंत्रणा कोरोना रुग्णांवर उपचार करण्यासाठी केंद्रित झाल्या असल्याने त्याचा अन्य आजारांच्या रुग्णांवर परिणाम होत असल्याचे माहे डिसेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आदिवासी पाड्यातील गर्भवती महिलांच्या आरोग्य समस्यांवर तसेच प्रसुतीच्या वेळी गरोदर स्त्रियांना रुग्णवाहिका मिळवून देण्यासाठी परिचारीका व आशा सेविकांना वेळ मिळत नसल्याने गेल्या दोन महिन्यात राज्यातील ११०५ मातांचे व अर्भकांचे मृत्यू झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने राज्यातील अन्य आजारांच्या रुग्णांवर उपचार करण्यासाठी तसेच आदिवासी भागातील गर्भवती महिलांच्या आरोग्य समस्यांवर उपाययोजना करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे :** (१) हे खरे नाही.

कोविड पॅन्डेमिकच्या काळात आरोग्य विभागातील मनुष्यबळ कोविड प्रतिबंध व नियंत्रण उपाययोजनामध्ये गुंतले असले तरी इतर आजारांचे सर्वेक्षणही सुरु आहे. जलजन्य आजार, किटकजन्य आजार आणि इतर साथरोग आजाराविषयक प्रतिबंध व नियंत्रण उपाययोजना राबविण्यात येत आहेत.

(२) अंशतः हे खरे आहे.

गर्भवती महिलांना बाळंतपणासाठी १०२ व १०८ क्रमांकाच्या आपतकालीन हेल्पलाईनव्दारे रुग्णवाहीका सेवा देण्यात येत आहे. एचएमआयएस च्या अहवालानुसार राज्यात डिसेंबर २०२१ या महिन्यात १०१

माता मृत्यू व जानेवारी महिन्यात ९२ माता मृत्यू झाल्याची नोंद आहे. तसेच राज्यात डिसेंबर, २०२१ या महिन्यात १३३६ व जानेवारी महिन्यात ११६६ अर्भक मृत्यू विविध कारणांमुळे झाल्याची नोंद आहे.

(३) सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत माता आरोग्य संबंधी योजना गरोदरपणातील संपूर्ण तपासणी व उपचार, संस्थांत्मक प्रसूती, जननी शिशु सुरक्षा कार्यक्रम, जननी सुरक्षा योजना, प्रधानमंत्री मातृत्व वंदना योजना, कोविड काळात व त्यानंतर माता बाल संगोपन सेवा सुरु ठेवणेकरीता उपाययोजना सुचविणेकरीता शासनाने संचालक, आरोग्य सेवा यांच्या अध्यक्षतेखाली नवजात बालरोग तज्ञ व स्त्रीरोग तज्ञांची समिती स्थापन केली असून या समितीच्या शिफारशीनुसार अतिरिक्त उपाययोजना राबविण्यात येतील.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मराठवाडा विभागातील जिल्हयांमध्ये ऑक्सिजन प्लँट उभारण्याबाबत तसेच बीड जिल्हयातील प्रलंबित असलेल्या ऑक्सिजन निर्मिती प्रकल्पाचे काम पूर्ण करण्याबाबत

**(६७) * १२४८५ डॉ.प्रज्ञा सातव, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मराठवाडा विभागामध्ये कोरोना व ओमायक्रॉनचा प्रादुर्भाव झपाट्याने वाढत असून तिसऱ्या लाटेच्या पार्श्वभूमीवर अनेक जिल्हयातील ऑक्सिजन निर्मिती प्रकल्पाचे काम प्रलंबित असल्याची बाब दिनांक १ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आष्टी, बीड, अंबेजोगाई, परळी व माजलगाव (जि.बीड) येथील ऑक्सिजन निर्मिती प्रकल्प अद्याप कार्यान्वित झाले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मराठवाड्यातील जिल्हयांमध्ये हवेतून तयार होणाऱ्या ऑक्सिजनचे ३६ व लिक्विड मेडिकल ऑक्सिजनचे २२ प्लँट उभारणीचे काम अद्याप बाकी आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, कोरोना व ओमायक्रॉन रुग्णांची वाढती संख्या लक्षात घेता भविष्यात रुग्णांना ऑक्सिजनची आवश्यकता भासल्यास ऑक्सिजन अभावी अनेक अडचणींना सामोरे जावे लागणार आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने मराठवाडा विभागातील जिल्हयांमध्ये ऑक्सिजन प्लँट उभारण्याबाबत तसेच बीड जिल्हयातील प्रलंबित असलेल्या ऑक्सिजन निर्मिती प्रकल्पाचे काम पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे :** (१) हे खरे नाही.

मराठवाड्यात नियोजित केलेल्या १०४ ऑक्सिजन निर्मित प्रकल्पांपैकी ८५ प्रकल्प कार्यान्वित झालेले आहेत व उर्वरित १९ प्रकल्पांचे काम सुरू आहे.
(२) हे खरे नाही.

बीड जिल्हयातील आष्टी, बीड,आंबेजोगाई, परळी व माजलगांव येथील ऑक्सिजन निर्मिती प्रकल्प कार्यान्वित आहेत.
(३) व (४) मराठवाड्यामध्ये १९ ऑक्सिजन निर्मिती प्रकल्प व २२ लिक्विड मेडिकल ऑक्सिजन प्रकल्प उभारण्याचे काम सुरु असून ते दिनांक ३१/०३/२०२२ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे.

तिसऱ्या लाटेमधील रुग्णसंख्येच्या अनुषंगाने ऑक्सिजनची पूर्तता करण्यात आली आहे.
(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## खर्डी (ता.शहापूर, जि.ठाणे) येथील अंगणवाडी इमारतीची दुरवस्था झाल्याबाबत

**(६८) * १३०२४ श्री.विक्रम काळे, श्री.शशिकांत शिंदे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अमोल मिटकरी :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौ.खर्डी (ता.शहापूर, जि.ठाणे) येथे केंद्र शासनाच्या केरळ पॅटर्न योजनेतून लाखो रुपये खर्च करुन अंगणवाडीची इमारत बांधून पूर्ण करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर इमारतीचा वापर न झाल्यामुळे तिची दुरवस्था होऊन त्यावर गवत वाढून भिंती व स्लॅब खिळखिळीत झाल्याने एक भाग कोसळल्याची घटना घडल्याचे तसेच तेथे दारुडे व गर्दुले येत असल्याचे दिनांक १७ नोव्हेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्हापरिषदेने परवानगी दिल्यानंतर अंगणवाडीची इमारत पाडण्यासंदर्भात आवश्यक ती प्रक्रिया सुरु असून खर्डी ग्रामपंचायतीला आर्थिक उत्पन्न मिळेल याचा विचार करुन नवीन इमारत बांधण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील असे प्रशासक खर्डी ग्रामपंचायत यांनी सांगितले असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर अंगणवाडी इमारतीचा वापर न करण्याची कारणे काय आहेत,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

(४), (५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## खानाव (ता.पनवेल, जि.रायगड) ग्रामपंचायतीचे सरपंच यांच्या गैरव्यवहाराची चौकशी करण्याबाबत

**(६९) * १३१२३ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खानाव (ता.पनवेल, जि.रायगड) ग्रामपंचायतीचे सरपंच यांनी सन २०१९-२०२० मध्ये राष्ट्रीय ग्राम स्वराज्य अभियानांतर्गत खानाव ग्रामपंचायत कार्यालयाचे कोणतेही बांधकाम व दुरूस्तीचे काम न करता रुपये ३,९९,०००/- इतक्या निधीचा गैरव्यवहार केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर दुरूस्तीचे काम हे ग्रामपंचायतस्तरावर झाल्याचे दाखवून सदर कामाचा निधी हा खानाव ग्रामपंचायतीकडे दिनांक ३१ मार्च, २०२१ रोजी वा त्यासुमारास गटविकास अधिकारी, पंचायत समिती, पनवेल यांनी वर्ग केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरचे काम हे मर्जीतील ठेकेदारामार्फत केल्याचे दाखवून कामाची खोटी देयके सादर करून सरपंच यांनी गैरव्यवहार केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चौकशीच्या अनुषंगाने संबंधित दोषींवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ :** (१) ग्रामपंचायत कार्यालयाने दुरुस्तीचे काम केले आहे. मात्र अंदाजपत्रकाव्यतिरिक्त काही बाबींवर खर्च केल्याचे दिसून येते.

(२) सदर कामाकरीता खानाव ग्रामपंचायतीकडे दिनांक ३१/०३/२०२० रोजी निधी वर्ग करण्यात आला होता.

(३) व (४) सदरचे काम मर्जीतील ठेकेदारामार्फत केल्याचे दाखवून कामाची खोटी देयके सादर करुन सरपंच यांनी गैरव्यवहार केला आहे हे खरे नाही. तथापि, या कामामध्ये झालेल्या वित्तीय अनियमिततेच्या अनुषंगाने कार्यकारी

अभियंता (बांधकाम), रायगड जिल्हा परिषद, अलिबाग व गट विकास अधिकारी, पंचायत समिती, अलिबाग यांची स्वतंत्र चौकशी समिती नेमण्यात आली आहे. समितीच्या अहवालानुसार कार्यवाही करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## डाहे (ता.वाडा, जि.पालघर) प्रकल्पाचे काम पूर्ण करण्याबाबत

**(७०) * १२३९९ श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) डाहे (ता.वाडा, जि.पालघर) येथील शेतकऱ्यांच्या कोरडवाहू शेतजमिनीला बारमाही पाणी उपलब्ध व्हावे यासाठी माती बंधाऱ्याचे (प्रकल्पाचे) काम हाती घेण्यात आले असून अद्‌याप प्रकल्पाचे काम झाले नसल्याचे माहे डिसेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू प्रकल्पाचे काम पूर्ण करण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी व सदर गावातील शेतकऱ्यांनी मा.जलसंपदा मंत्री यांचेकडे लेखी निवेदनाद्‌वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन डाहे प्रकल्पाचे काम पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शंकरराव गडाख :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) सदर योजना पालघर जिल्ह्यातील वाडा तालुक्यातील असून त्यास जलसंपदा विभागाकडून दिनांक ३१/१०/१९७७ रोजी रुपये २१,१३,९६९/- इतक्या रक्कमेस प्रशासकीय मान्यता मिळालेली असून, कामप्रित्यर्थ रुपये १८,७९,२९८/- व अनुषांगिक खर्च रुपये २,३४,६७१/- इतका आहे. सदर योजना जलसंपदा विभागाकडून जलसंधारण विभागाकडे सन १९९४ ला हस्तांतरित झालेली आहे. जलसंधारण विभागाकडे हस्तांतरित होण्यापूर्वी वन कायदा १९८० लागू झाल्यामुळे सदर योजनेचे काम बंद आहे. सदर योजनेचे धरणाचे ३५ % काम पूर्ण करण्यात आलेले आहे.

या योजनेवर २४.६८ लक्ष इतका खर्च झाला आहे. या योजनेसाठी जिल्हाधिकारी, बीड यांच्या दिनांक १२/०५/१९९७ च्या आदेशानुसार वन जमीन ७१.७३ हेक्टर प्राप्त झालेली आहे. परंतु उपविभागीय वन अधिकारी, बीड यांनी त्यातील १२.१० हेक्टर जमिनीवर अतिक्रमण झाल्याचे निदर्शनास आणून दिले आहे. उर्वरित १२.१० हेक्टर पर्यायी वनेत्तर जमीन महसूल खात्याकडून वनखात्याकडे ताब्यात घेण्याचे काम चालू आहे.

तसेच सुधारीत अंदाजपत्रक तयार करण्यापूर्वी माती धरणाचे संकल्पन प्राप्त करून घेण्यासाठी मुख्य अभियंता, मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक यांना मातीधरण काटछेद व सांडवा संकल्पन प्रस्ताव सादर केलेला आहे. त्यांच्याकडून संकल्पन प्राप्त झाल्यावर, या योजनेस सुधारीत प्रशासकीय मान्यता घेवून योजनेचे काम निधीच्या उपलब्धतेनुसार पूर्ण करण्यात येईल

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## फिनले मिल (ता.अचलपूर, जि.अमरावती) येथील कामगारांचा थकीत पगार देण्याबाबत

**(७१) * १२३६२ श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) फिनले मिल (ता.अचलपूर, जि.अमरावती) दोन वर्षापूर्वी बंद झाली असल्याने तेथील कामगारांनी आंदोलन सुरू केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गत १७-१८ महिन्यापासून या कामगारांना अर्धा पगार दिला जात होता उर्वरित अर्धा पगार रेल्वे विभागाने त्यांचेकडे थकीत असलेले रुपये १२९ कोटी दिल्यानंतर दिला जाईल असे लेखी आश्वासन दिले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रेल्वे विभागाने रुपये १२९ कोटी दिल्यानंतरही कामगारांना थकीत पगार दिला गेला नसल्यामुळे ८०० कामगारांची उपासमार होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने फिनले मिल कामगारांचा थकीत पगार

मिळवून देण्याबाबत व त्यांच्या उर्वरित मागण्या पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ :** (१) हे खरे आहे.

मिल सुरु करण्यासंदर्भात फिनले मिल कामगारांनी दिनांक २३/०८/२०२१, दिनांक ०३/०१/२०२२ व दिनांक ०१/०२/२०२२ रोजी आंदोलन केले होते.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) सदर मिलची उत्पादन प्रक्रिया बंद असल्याने सद्य:स्थितीत अत्यावश्यक सेवेतील कर्मचाऱ्यांना १००% व उर्वरित कर्मचाऱ्यांना प्रतिमाह ५०% वेतन दिले जात आहे.

कामगारांचे थकित वेतन मिळणेबाबत व सदर मिल सुरु करण्यासंदर्भात मा.राज्यमंत्री (कामगार) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ०२/०७/२०२० व दिनांक १७/०१/२०२२ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती.

सदरहू मिल राष्ट्रीय वस्त्रोद्योग महामंडळाचा (भारत सरकार) अधिकृत उपक्रम असल्यामुळे मा.राज्यमंत्री (कामगार) यांनी दिनांक ०२/०७/२०२० रोजी घेतलेल्या बैठकीत दिलेल्या निर्देशानुसार कामगार उप आयुक्त, अमरावती यांनी दिनांक २१/०७/२०२० रोजी मिलमधील उत्पादन प्रक्रिया सुरु करण्याबाबतचा प्रस्ताव चीफ जनरल मॅनेजर, राष्ट्रीय वस्त्रोद्योग महामंडळ (NTCL), मुंबई यांना सादर केला आहे.

मिल सुरु करण्यासंदर्भात मा.राज्यमंत्री (कामगार) यांच्या स्तरावर मा.मंत्री (वस्त्रोद्योग), भारत सरकार यांना दिनांक ३०/०८/२०२१ रोजीच्या पत्रान्वये विनंती करण्यात आलेली आहे. तसेच, मा.राज्यमंत्री (कामगार) यांच्या निदेशानुसार मिल सुरु करण्यासंदर्भात राष्ट्रीय वस्त्रोद्योग महामंडळाकडे मा.मंत्री (वस्त्रोद्योग), महाराष्ट्र शासन यांच्यामार्फत पाठपुरावा करण्यासंबंधीचा प्रस्ताव कामगार उप आयुक्त, अमरावती यांनी दिनांक ०४/०२/२०२२ रोजी मा.राज्यमंत्री (कामगार) यांच्याकडे सादर केला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्याच्या जलसंपदा विभागामार्फत करण्यात आलेल्या खर्चाच्या माहितीबाबत

**(७२) * १२७४१ श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, डॉ.परिणय फुके, श्री.सुरेश धस, डॉ.रणजित पाटील, श्री.सदाशिव खोत, श्री.प्रसाद लाड, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.निलय नाईक, श्री.प्रवीण दटके, श्री.रमेशदादा पाटील, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मा.विरोधी पक्षनेता, विधान परिषद यांनी अपर मुख्य सचिव (जलसंपदा) यांना दिनांक २९ डिसेंबर, २०२१ रोजी जलसंपदा विभागामार्फत करण्यात आलेल्या खर्चाबाबत पत्र दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने जलसंपदा विभागाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयंत पाटील :** (१), (२) व (३) जलसंपदा विभागामार्फत झालेल्या खर्चाची माहिती मागविणारे मा.विरोधी पक्षनेते यांची दिनांक २९/१२/२०२१ ची दोन पत्रे जलसंपदा विभागास प्राप्त झाली आहेत हे खरे आहे.

याबाबत क्षेत्रिय स्तरावरून माहिती संकलीत केली जात आहे. सदर माहिती दिर्घ कालावधीची व विस्तृत स्वरूपाची असून ती संकलीत करण्यास काही कालावधी लागत असल्याची वस्तुस्थिती मा.विरोधी पक्षनेते यांना दिनांक २१/२/२०२२ रोजीच्या पत्रान्वये अवगत करण्यात आली आहे.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**श्री.राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.